- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

सोने-चांदी
✔ २४ कॅरेट : १,२२,७०० /-
✔ २२ कॅरेट : १,१२,३५० /-
✔ चांदी : १,७८,३००/-

दैनिक
सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर | संचालक-संपादक : अजय बिवडे

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : सोमवार, २३ नोव्हेंबर २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : ३४३ | किंमत : २ रूपये

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

धुळ्यातील पवार कुटुंबावर काळाचा घाला, भीषण अपघातात ९ ठार

राजस्थानमधील खाटू श्याम येथे देवदर्शन करून परतताना झाला अपघात

वृत्तसंस्था, धुळे

राजस्थानमधील खाटू श्याम येथे देवदर्शन करून परतणाऱ्या धुळे जिल्ह्यातील भाविकांच्या वाहनाला कोटा येथे मध्यरात्री भीषण अपघात झाला. या दुर्दैवी घटनेत पवार कुटुंबातील नऊ जणांचा जागीच मृत्यू झाला. तर सहा जण जखमी झाले आहेत. जखमींपैकी दोघांची प्रकृती गंभीर आहे. सर्वांवर कोटा येथील शासकीय रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

एकाच कुटुंबातील आणि नात्यागोत्यातील ९ जणांचा मृत्यू झाल्याने धुळे शहरातील सत्यसाईबाबा नगर आणि परिसरावर शोककळा पसरली आहे.

कोटा (राजस्थान) येथील पोलीस नियंत्रण कक्षाकडून मिळालेल्या माहितीनुसार, धुळे जिल्ह्यातील भाविक तीन वाहनांतून खाटू श्याम येथे देवदर्शनासाठी गेले होते. दर्शन आटोपून परत येत असताना या तीन वाहनांपैकी फोर्स ट्रॅव्हलर वाहनाचा काल रात्री १२ वाजेच्या सुमारास कोटा येथे भीषण अपघात झाला. या वाहनात एकूण १५ प्रवासी होते. त्यापैकी ९ जणांचा जागीच अंत झाला, तर ६ जण जखमी झाले. सर्व मृतदेह कोटा येथील न्यू मेडिकल कॉलेज रुग्णालयात ठेवण्यात आले आहेत.

या दुर्दैवी घटनेनंतर अपघातग्रस्त कुटुंबातील एका सदस्याने रात्री नेमके काय घडले, याचा थरारक अनुभव बोलून दाखवला. अपघातग्रस्त कुटुंबातील व्यक्तीचा फोन कुटुंबातील इतर व्यक्तींना मिळाल्यानंतर कुटुंबीयांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतल्याची माहिती समोर आली आहे.



अपघाताची माहिती देताना नातेवाईकाने सांगितले की, आम्ही सर्वजण ३६ नातेवाईक मिळून तीन गाड्यांमधून खाटूश्यामजींचे दर्शन घेतले होते. यानंतर आम्ही घरी परत जाण्यासाठी दिशेने परततलो. प्रवासादरम्यान आम्ही एका हॉटेलवरही थांबलेलो. यातील आमच्या दोन गाड्या मागे राहिल्या, तर अपघातग्रस्त तिसरी गाडी पुढे निघून गेलेली. तेवढ्यात बहिणीचा फोन आला की आमच्या गाडीचा अपघात झाला. ही बातमी कळताच आम्ही तात्काळ घटनास्थळी धाव घेतली होती.

नातेवाईक पुढे म्हणाले की, जेव्हा ते घटनास्थळी पोहोचले तेव्हा गाडीचा चक्काचूर झालेला दिसला. जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल केले गेले. दुसरीकडे, कोटाचे अतिरिक्त जिल्हाधिकारी राजेश जोशी यांनी या घटनेची चौकशी केली.

थोडक्यात

भाजप खासदार रामराव वडकुते यांचे निधन



हिंगोली : भाजपचे राज्यसभेचे खासदार रामराव वडकुते यांची उपचारादरम्यान दिल्लीत प्राणज्योत मालवली. दिल्लीतील एम्स रुग्णालयात वडकुते यांनी ७२ व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला. त्रास जाणवत असल्याने ते स्वतः रुग्णालयात उपचारासाठी दाखल झाले होते. सात महिन्यांपूर्वीच त्यांची राज्यसभेवर निवड झाली होती. हिंगोली आणि मराठवाड्यातील ओबीसी चळवळीचे ते चेहरा होते.मराठवाड्यातील धनगर आणि ओबीसी चेहरा म्हणून भाजपने त्यांना राज्यसभेची खासदारकी दिली होती. मार्च २०२६ मध्ये महाराष्ट्रातून त्यांचा नावाची घोषणा झाली होती. त्यांच्यावर मंगळवारी हिंगोली येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

कुंभमेळ्याइतकाच ३० हजार कोटींचा निधी दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांनाही द्या!

वृत्तसंस्था, मुंबई

कुंभमेळ्याइतकाच ३० हजार कोटी रुपयांचा निधी दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांनाही द्या, अशी मागणी आंतरराष्ट्रीय हिंदू परिषदेचे नेते डॉ. प्रवीण तोगडिया यांनी सरकारकडे केली आहे. विदर्भ-मराठवाड्यात भीषण दुष्काळाची चाहूलआहे. युद्धपातळीवर चारा व पाणीपुरवठ्याची सोय करावी असेही तोगडिया म्हणाले. शेतकऱ्यांच्या हातात रोख पैसे द्या, तिजोरी खाली करण्याचे पुण्य घ्या, असा सल्ला तोगडिया यांनी सरकारला दिला आहे. जनावरांची कवडीमोल किंमतीत विक्री आणि शेतकरी आत्महत्या आणि दुष्काळावर तोगडिया यांनी परखड मत व्यक्त केले आहे.

विदर्भ आणि मराठवाड्यात दुष्काळाची तीव्र झळ जाणवत असून, आत्तापासूनच पाण्याची आणि चाऱ्याची टंचाई निर्माण झाली आहे. ७० ते ८० हजार रुपयांची गाय-म्हैस शेतकऱ्यांना अवघ्या ३० हजार रुपयांत विकावी लागत असल्याची गंभीर स्थिती आहे, तर १५२ शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या आकडेवारीवरून परिस्थितीचे गांभीर्य दिसून येते. कुंभमेळ्याच्या तयारीसाठी राज्य सरकारकडून ३० हजार कोटी रुपयांचा खर्च केला जात आहे. त्याबद्दल देवेंद्र फडणवीस यांचे कौतुक असले, तरी तितकाच म्हणजेच ३० हजार कोटी रुपयांचा खर्च दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठीही करावा, अशी स्पष्ट मागणी आंतरराष्ट्रीय हिंदू परिषदेचे नेते डॉ. प्रवीण तोगडिया यांनी केली आहे. जिथे पाणीटंचाई निर्माण होणार आहे, अशी गावे आत्ताच निश्चित करून पुढील महिन्याभरात पाणीपुरवठ्याची व्यवस्था सुरू करावी.राज्यात पुरेसा चारा उपलब्ध नसल्याने कर्नाटक, मध्य प्रदेश आणि गुजरात सरकारशी चर्चा करून युद्धपातळीवर चारा खरेदी करावा, जेणेकरून शेतकऱ्यांना जनावरे विकावी लागणार नाहीत. दर एक-दोन महिन्यांनी शेतकऱ्यांच्या हातात रोख पैसे द्यावेत.

डॉ. प्रवीण तोगडियांची मागणी



महाराष्ट्राचा पारा घसरला, थंडी वाढली, विदर्भात पावसाची शक्यता

मुंबई : राज्यात हळूहळू थंडी वाढू लागली असून उत्तर महाराष्ट्रातील अनेक भागांमध्ये तापमानाचा पारा आठ अंशांच्या आसपास घसरला आहे. त्यामुळे नागरिकांना सकाळी आणि रात्री चांगलीच हुडहुडी भरत आहे. मध्य महाराष्ट्रातही थंड वाऱ्यांमुळे गारठा कायम आहे. दुसरीकडे विदर्भातील काही भागांत पावसाच्या हलक्या सरी कोसळल्याने हवामानात बदल जाणवत आहे. राज्यातील हवामानात पुढील काही दिवस चढ-उतार होण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. हवामान विभागाच्या ताज्या अंदाजानुसार, जळगाव आणि धुळे येथे किमान तापमान आठ अंशांच्या आसपास नोंदवण्यात आले. निफाडमध्येही पारा ८.२ अंशांपर्यंत खाली आला आहे. नाशिकमध्ये किमान तापमान १० अंश सेल्सिअस नोंदले गेले. त्यामुळे या परिसरात पहाटेच्या वेळी थंडी अधिक जाणवत आहे. मध्य महाराष्ट्रातील पुणे, सातारा आणि जेऊर परिसरातही तापमान तुलनेने कमी राहिले. पुण्यात ११.२ अंश, तर जेऊर आणि सातारा येथे प्रत्येकी १२ अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद झाली.

मंत्रालयातील लिपिकांचे काम बंद आंदोलन

राज्यातील कारभारावर होणार परिणाम?



वृत्तसंस्था, मुंबई

मंत्रालयातील कामकाज आगामी काळात ठप्प होण्याची शक्यता निर्माण झाल्याचे समोर आले आहे. मंत्रालयातील लिपीक वेतनश्रेणी सुधारणा आणि पदनाम बदलाची दीर्घकाळापासून मागणी करत आहेत. मंत्रालयातील संघटनांच्या वतीने १८ नोव्हेंबर रोजी मंत्रालयातील आरसा गेटवर आंदोलन करण्यात आले होते. आता शासनाने निर्णय न घेतल्यास २५ नोव्हेंबर रोजी बेमुदत काम बंद आंदोलन छेडले जाईल, असा इशारा संघटनेने दिला आहे.

मंत्रालयातील कामकाजासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षा उत्तीर्णांतून कर्मचा-यांची निवड झाली आहे. निवड झालेले कर्मचारी मंत्रिमंडळ व विधिमंडळ कामकाज, धोरणात्मक निर्णय, न्यायालयीन प्रकरणे आणि शासन निर्णयांचे गोपनीय मसुदे तयार करण्याची अत्यंत महत्त्वाची जबाबदारी पार पाडताहेत. मात्र, त्यांना मिळणारे वेतन अत्यंत तुटपुंजे असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे.

मुंबईसारख्या महागड्या शहरात नव्याने रुजू झालेल्या लिपिकाला साधारण ३५ हजार रुपये दिले जात आहेत. घरभाडे, मुलांचे शिक्षण, कुटुंबाचा उदरनिर्वाह, मुंबईतील प्रवासखर्च हे वेतन अपुरे तरत आहे. यामुळे कर्मचाऱ्यांचे आर्थिक आणि मानसिक स्वास्थ धोक्यात आल्याचा दावा संघटनेने व्यक्त केला आहे. वेतनवाढ होत नसल्याने अनेक तरुण कर्मचारी नोकरी सोडू लागले आहेत. नोकरी सोडणारे तरुण आता जिल्हास्तरीय सेवांकडे वळत आहेत. त्यात मंत्रालयातील ४० टक्के लिपिक पदे रिक्त आहेत. यामुळे कर्मचा-यांवर कामाचा प्रचंड ताण पडत असल्याचे मत संघटनेने व्यक्त केले.

मागील काही दिवसांत वस्तू व सेवा कर विभागातील कर सहाय्यक, मुंबई महापालिका, उच्च न्यायालय आणि विधानमंडळातील समकक्ष पदांच्या वेतनश्रेणीत आणि पदनामात सुधारणा करण्यात आली आहे. परंतु मंत्रालयीन लिपिकांवरच हा अन्याय का, असा सवाल संघटनेने विचारला आहे. चौथ्या वेतन आयोगापासूनची वेतनविसंगती कायम आहे. त्यामुळे सातव्या वेतन आयोगातील बक्षी समितीच्या शिफारशींचीही अद्याप अंमलबजावणी झालेली नाही, असे संघटनेचे म्हणणे आहे. त्यामुळे संघटनेने आंदोलनाचा इशारा शासनाला दिला आहे. आता या इशाऱ्यानंतर शासन काय निर्णय घेते, याकडे मंत्रालयातील लिपिकांचे लक्ष लागले आहे.



संपादकीय लेखणीतून...

संयुक्त राष्ट्रसंघाची प्रवर्तकाची भूमिका

ग्रीक-पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा मुकुटमणी सॉक्रेटीस यांच्या स्मरणार्थ दरवर्षी ३० नोव्हेंबर हा दिवस 'जागतिक तत्त्वज्ञान दिन' म्हणून साजरा केला जातो. तथापि संयुक्त राष्ट्रसंघाने १९ नोव्हेंबर हा दिवस जागतिक तत्त्वज्ञान दिन म्हणून जाहीर केला आहे. मात्र पहिला जागतिक तत्त्वज्ञान दिन दि. २१ नोव्हेंबर २००२ रोजी साजरा झाला. संयुक्त राष्ट्रसंघातर्फे सन २००२ पासून "तत्त्वज्ञान दिन" राष्ट्रसंघाच्या मुख्यालयात आणि इतर ठिकाणी नोव्हेंबरच्या तिसऱ्या गुरुवारी साजरा केला जात असे. मोहम्मद आचारी यांनी दि.१९ मे २००४ रोजी दिलेल्या प्रस्तावानुसार त्यास जागतिक दर्जा देण्याचे मान्य करण्यात आले. हा प्रस्ताव दि. १३ जानेवारी २००५ रोजी राष्ट्रसंघाच्या आमसभेत मांडला गेला. आचारी यांच्यातर्फे त्यांच्या प्रतिनिधी मिस अझीझा बेन्नानी यांनी दि. ७ फेब्रुवारी २००५ रोजी राष्ट्रसंघाचे कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष हान्स हाईनरिश ब्रेदे यांना प्रस्ताव सादर केला. त्यानंतर "असा दिवस साजरा करणे शक्य आहे का ?" यासाठीची अभ्यास समिती नियुक्त झाली. त्यासाठी सन २००२, २००३ आणि २००४ साली जगात ठिकठिकाणी साजऱ्या झालेल्या "तत्त्वज्ञान दिना"च्या कार्यक्रमांचा अभ्यास करण्यात आला. या दिनास आंतरराष्ट्रीय दर्जा देण्याविषयी जगातील नामवंत विचारवंत आणि सामान्य नागरिकांकडून मोठा प्रतिसाद मिळाला. राष्ट्रसंघाच्या ७९ सदस्य देशांमधील ९५ तत्त्वज्ञानविषयक संस्थांनी "जागतिक तत्त्वज्ञान दिन" साजरा करण्यासाठी मोठी तयारी दर्शविली. त्यांत आफ्रिकेतील २२ संस्था होत्या. त्यापैकी सहा अरब प्रांतातील होत्या. १७ आशिया आणि पॅसिफिक, २२ युरोप आणि उत्तर अमेरिका आणि १२ लॅटिन अमेरिका आणि कॅरेबियन प्रांतांतील होत्या. २००२ साली या सर्वांमधील ५३ राष्ट्रांनी सन २००२ मध्ये आपापल्या राष्ट्रात "तत्त्वज्ञान दिन" साजरा केला होता.

जागतिक तत्त्वज्ञान दिन सुरू करणे, त्यास मान्यता देणे ही कामे संयुक्त राष्ट्रसंघाने केली आहेत, पण या दिनावर मालकी प्रस्थापित केलेली नाही. तत्त्वज्ञानाची काळजी वाहणाऱ्या प्रत्येकाचा हा दिन असून कुणीही कुठेही कोणतीही तत्त्वज्ञानप्रेमी व्यक्ती हा दिवस आपापल्यापरीने साजरा करू शकतात, अशी संयुक्त राष्ट्रसंघाची भावना आहे. व्यक्ती आणि समाज यांच्यासाठी मुक्त आणि खुले अवकाश प्राप्त करून देणाऱ्या जगात कुठेही होणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या तत्त्वज्ञानात्मक चिंतनाप्रती आदरभाव व्यक्त करण्यासाठी हा दिवस साजरा करण्याचे धोरण राष्ट्रसंघाने ठरविले आहे. त्यासाठीच नोव्हेंबर मधील तिसरा गुरुवार हा जागतिक तत्त्वज्ञान म्हणून साजरा करण्याचा निर्णय राष्ट्रसंघाने त्यांच्या जाहीरनाम्यात व्यक्त केला. जागतिक तत्त्वज्ञान दिन संयुक्त राष्ट्रसंघाने जाहीर करावा, त्यास मान्यता द्यावी आणि त्याचा जगभर पुरस्कार करावा, असा प्रस्ताव मोरोक्को या आफ्रिकन देशाच्या संस्कृती मंत्रालयाचे तत्कालीन मंत्री मोहम्मद आचारी यांनी राष्ट्रसंघास दिला. त्याचा विचार करून राष्ट्रसंघाने २१ नोव्हेंबर हा दिवस केला.

लोकांनी आपला तत्त्वज्ञानात्मक वारसा इतरांपर्यंत पोहोचवावा, नव्या कल्पनांना सामोरे जाण्यासाठी आपली मने खुली करावीत, त्याचप्रमाणे आपला समाज ज्या आव्हानांना तोंड देत आहे, त्याविषयी सर्वसामान्य नागरी समाज आणि समाजातील बुद्धिमंत वर्ग यांच्यात सार्वजनिक संवाद साधला जावा, असा संवाद साधण्यासाठी त्यांनी उद्युक्त व्हावे, हा हेतू या दिनाच्या प्रवर्तनामागे आहे. दरवर्षी जागतिक तत्त्वज्ञान दिन साजरा करण्यातून प्रत्येक व्यक्ती, प्रत्येक संस्कृती आणि मानवी विचार यांचा विकास यांच्यात निहित असलेले तत्त्वज्ञानाचे चिरकाल मूल्य संयुक्त राष्ट्रसंघ अधोरेखित करते. संयुक्त राष्ट्रसंघ नेहमीच तत्त्वज्ञानाशी जोडले गेलेले आहे; पण स्वैर कल्पनाधारित तत्त्वज्ञान अथवा आदर्शात्मक तत्त्वज्ञान यांच्याशी ते संबंधीत नाही, तर आंतरराष्ट्रीय संदर्भात प्रत्येक मानवी कृतीला आणि जीवनाला अर्थ देऊ शकणाऱ्या चिकित्सक, प्रश्नार्थक अभिवृत्तीला अभिवादन करण्यासाठी हा दिन संयुक्त राष्ट्रसंघ साजरा करते. तत्त्वज्ञान दिनास जागतिक दिनाचा दर्जा देण्यामागे संयुक्त राष्ट्रसंघाने काही विशिष्ट उद्दिष्टे निश्चित केली आहेत. ती त्यांच्या जाहीरनाम्यात दिली आहेत. तत्त्वज्ञानाबद्दल प्रत्येक सदस्य राष्ट्रात राष्ट्रीय स्तरावर, त्या राष्ट्रातील विविध प्रांत, तसेच उपप्रांतात आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर बांधिलकीचे पुनरुज्जीवन करणे. मानवतेला आज भेडसावत असलेल्या विविध प्रकारच्या आव्हानांवर परिणामकारक उपाय सुचवू पाहणाऱ्या तत्त्वज्ञानात्मक अभ्यासास, संशोधनास आणि विश्लेषणास प्रोत्साहन देणे. तत्त्वज्ञानाच्या महत्त्वाविषयी आणि विशेषतः अनेक समाजांना आधुनिकतेत प्रवेश करताना कराव्या लागणाऱ्या निवडीमुळे उद्भवत असणाऱ्या परिणामांना आणि जागतिकीकरणाच्या परिणामांना तोंड देताना उद्भवणाऱ्या समस्यांची निवड करताना तत्त्वज्ञानाच्या चिकित्सक उपयुक्ततेविषयी व्यापक जनजागरण करणे. संपूर्ण जगातील तत्त्वज्ञानाच्या शिक्षणाचे पुनर्मूल्यांकन करणे; विशेषतः तत्त्वज्ञान शिकण्याची संधी समानतेने उपलब्ध करून देणे. भावी पिढ्यांसाठी तत्त्वज्ञान शिकण्याचे जागतिक सार्वत्रिकीकरण करण्याचे महत्त्व अधोरेखित करणे.

या उद्दिष्टांना अनुसरून संयुक्त राष्ट्रसंघाने काही साध्येही जाहीरनाम्यात नमूद केली आहेत. व्यापक आंतरराष्ट्रीय पातळीवर मुक्त, चिकित्सक आणि जबाबदार तत्त्वज्ञानात्मक चिंतनाची गरज आहे, याची जाणीव निर्माण करणे. तत्त्वज्ञानाचा प्रचार आणि प्रसार व्हावा यासाठी विचारवंत, धोरणकर्ते, शैक्षणिक संस्था आणि माध्यमे यांना पुढाकार घ्यायला प्रवृत्त करणे. सामाजिक आणि मानव्य विज्ञाने, नीतिशास्त्र आणि तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात आंतरराष्ट्रीय सहकार्याची सुरुवात करणे आणि सहकार्य वाढवणे. तत्त्वज्ञानाचे शिक्षण आणि त्याचे व्यावहारिक उपयोजन करण्यात नव्या दृष्टिकोनांचे आणि नव्या पद्धतींचे विस्तृत विवेचन लोकांसमोर आणणे.या संदर्भातील संयुक्त राष्ट्रसंघाची प्रवर्तकाची भूमिका, त्यांचे सारे प्रयत्न, त्यांचे अधिकार आणि त्यांची बौद्धिक चळवळ सर्वत्र पोहोचवणे. भारतात प्रामुख्याने विद्यापीठ स्तरावर आणि काही प्रमाणात महाविद्यालयीन पातळीवर जागतिक तत्त्वज्ञान दिन साजरा होतो. इंडियन कौन्सिल फॉर फिलॉसॉफिकल रिसर्च ही तत्त्वज्ञानविषयक शिखरसंस्था या दिनासाठी अनुदान देते. या संस्थेने नोव्हेंबरच्या तिसऱ्या आठवड्यात हा दिवस निश्चित केला आहे. सन २०१५ या वर्षाकरिता या संस्थेने रु. २०,०००/- (वीस हजार फक्त) अनुदान दिले. अनुदानासाठी अर्ज केल्यानंतर काही निकषांनुसार अर्जांची छाननी होऊन निवडक अर्जांना मान्यता देण्याची संस्थेची प्रथा आहे.

भारताची वाढती आर्थिक ताकद, तरीही 'एपेक' चे सदस्यत्व दूरच !

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था आणि जागतिक विकासाचे प्रमुख केंद्र असलेल्या भाराताला, आशिया-पॅसिफिकमधील सर्वात महत्त्वाच्या आर्थिक मंचापैकी एक असलेल्या 'एपेक' आशिया-पॅसिफिक आर्थिक सहकार्य संघटन) मध्ये अद्याप स्थान मिळवता आलेले नाही. तथापि, हे भारताच्या आर्थिक क्षमतेच्या किंवा जागतिक महत्त्वाच्या अभावामुळे नाही. भारताने २००७ मध्ये सदस्यत्वासाठी औपचारिकपणे अर्ज केला होता, परंतु जवळपास १९ वर्षांनंतरही या प्रकरणात कोणतीही प्रगती झालेली नाही. खरे तर, १९९८ पासून 'एपेक'चा विस्तार झालेला नाही. सदस्य देशांचे आपापले आर्थिक आणि सामरिक हितसंबंध, व्यापार धोरणांवरील मतभेद आणि एकमताची गरज हे भारताच्या मागार्तील प्रमुख अडथळे आहेत. मग प्रश्न असा निर्माण होतो की: जेव्हा भारताची जागतिक आर्थिक भूमिका सातत्याने वाढत आहे, तेव्हा 'एपेक'चा विस्तार का थांबला आहे ?

भारत एपेक संघटनेत कधीही सामील झालेला नसल्यामुळे अधिक आणि जगाच्या लोकसंख्येच्या अंदाजे ३८ टक्के भागाचे प्रतिनिधित्व करतात. एपेकचे वैशिष्ट्य म्हणजे ते खुला संवाद, समान सहभाग आणि एकमताच्या आधारावर कार्य करते. त्याचे निर्णय बंधनकारक कायदेशीर करार नसतात; उलट, सदस्य अर्थव्यवस्था स्वेच्छेने आपल्या वचनबद्धतेची अंमलबजावणी करतात. एपेक ही प्रामुख्याने पॅसिफिक महासागराच्या किनाऱ्यावरील देशांची आर्थिक संघटना आहे. भारताची सीमा थेट पॅसिफिक महासागराला लागून नसल्यामुळे अनेक सदस्य देशांनी भौगोलिक कारणावरून आक्षेप घेतला आहे. भारताची सीमा हिंदी महासागराला लागून आहे, पॅसिफिक महासागराला नाही. त्यामुळे अनेक सदस्य देशांनी भौगोलिक निकषांवर आक्षेप घेत भारताच्या प्रवेशाला विरोध केला होता.

एपेक म्हणजे काय आणि ते इतके महत्त्वाचे का आहे ?

आशिया-पॅसिफिक आर्थिक सहकार्य ची स्थापना नोव्हेंबर १९८९ मध्ये प्रादेशिक आर्थिक सहकार्य आणि व्यापाराला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने झाली. याची सुरुवात १२ संस्थापक सदस्यांसह झाली. आज, यात २१ सदस्य अर्थव्यवस्थांचा समावेश आहे. एकत्रितपणे, या अर्थव्यवस्था जागतिक जीडीपीच्या ६० टक्क्यांहून अधिक, जागतिक व्यापाराच्या ५० टक्क्यांहून अधिक व्यापार करतात.

एपेकचे मुख्य उद्दिष्ट मुक्त व्यापार आणि गुंतवणुकीला चालना देणे हे आहे. भारताची आयात शुल्क धोरणे आणि देशांतर्गत उद्योगांना दिलेले संरक्षण या संघटनेच्या नियमांच्या तुलनेत कडक मानले जाते.

भारताच्या सदस्यत्वापुढील एक मोठे आव्हान म्हणजे त्याच्या व्यापार धोरणाबाबत काही देशांनी व्यक्त केलेली चिंता. एपेकचे प्राथमिक उद्दिष्ट प्रादेशिक व्यापाराला चालना देणे आणि आर्थिक उदारीकरणाला प्रोत्साहन देणे हे आहे. दुसरीकडे, भारत आपल्या देशांतर्गत उद्योग, शेतकरी आणि लहान व्यवसायांचे हित लक्षात घेऊन व्यापारासंबंधी निर्णय घेतो. या संदर्भात, प्रादेशिक व्यापक आर्थिक भागीदारी करारातून भारताने शेवटच्या क्षणी घेतलेली माघारही महत्त्वपूर्ण होती. या करारामध्ये सामील झाल्यामुळे स्वस्त चिनी उत्पादनांची आयात वाढेल आणि देशांतर्गत उद्योगांना हानी पोहोचेल, अशी भीती भारताला वाटत होती. तथापि, माजी राजनैतिक अधिकारी अनिल वाधवा यांच्या मते, भारताला संरक्षणवादी देश म्हणून पाहणे अन्यायकारक आहे. भारत अनेक देशांसोबत व्यापारी करार करत असून जागतिक आर्थिक सहकार्यामधील त्याचा सहभाग सातत्याने वाढत आहे.

भारताच्या संभाव्य सदस्यत्वाकडे केवळ आर्थिक विस्ताराचे साधन म्हणून नव्हे, तर प्रादेशिक सामरिक संतुलनाच्या दृष्टिकोनातूनही पाहिले जाते. काही सदस्य देशांना भीती वाटते की, भारताच्या समावेशामुळे एपेकचे भौगोलिक आणि सामरिक लक्ष पॅसिफिकच्या पलीकडे जाऊन व्यापक आशियाई प्रदेशाकडे वळू शकते. शिवाय, संघटनेतील निर्णय सहमतीने घेतले जातात. त्यामुळे, काही देशांना वाटते की भारताच्या व्यापारी सवलतींचा उदारीकरणाच्या निर्णयांच्या गतीवर परिणाम होऊ शकतो. दुसरीकडे, भारताची वाढती आर्थिक ताकद, मोठी ग्राहक बाजारपेठ आणि जागतिक पुरवठा साखळीतील वाढती भूमिका यांमुळे तो या मंचासाठी एक महत्त्वाचा संभाव्य भागीदार ठरतो. या संघटनेत नवीन सदस्य घेण्यासाठी सर्व २१ सदस्य देशांची एकमताने संमती आवश्यक असते. विशेषतः अमेरिकेची अनिच्छा आणि आशियातील चीनच्या वाढत्या प्रभावाचे संतुलन राखण्याबाबतचे मतभेद यामुळे भारताच्या अर्जावर अंतिम निर्णय होऊ शकलेला नाही.

संघटनेत चीनचे मोठे वर्चस्व आहे. बदलत्या भू-राजकीय परिस्थितीत चीन आणि इतर काही देशांमधील मतभेदांमुळे भारताच्या सदस्यत्वावर एकमत होऊ शकलेले नाही.भारताने १९९० च्या दशकात आणि नंतर २००७ मध्ये सदस्यत्वासाठी अधिकृत अर्ज केला होता. सध्या भारताला केवळ काही बैठकांमध्ये 'निमंत्रित पाहुणा' म्हणून बोलावले जाते, परंतु पूर्णवेळ सदस्यत्व अद्याप मिळालेले नाही.

थोडक्यात, भारताची वाढती आर्थिक ताकद, विशाल बाजारपेठ आणि जागतिक स्तरावरील प्रभाव लक्षात घेता 'एपेक'चे सदस्यत्व भारतासाठी महत्त्वाचे ठरू शकते. मात्र, भौगोलिक मर्यादा, व्यापार धोरणांतील मतभेद आणि सदस्य देशांचे सामरिक हितसंबंध यांमुळे भारताचा प्रवेश अद्याप रखडला आहे. भविष्यात भारताला या मंचावर स्थान मिळणे हे केवळ आर्थिक सहकार्याच्या दृष्टीने नव्हे, तर आशिया-पॅसिफिक क्षेत्रातील सामरिक संतुलन आणि जागतिक व्यापारातील भारताची भूमिका अधिक बळकट करण्यासाठीही महत्त्वाचे ठरेल.

-९५६१५१४३०६

वेलिंग्टन कसोटी : चौथ्या दिवशी भारताची विक्रमी फलंदाजी; न्यूझीलंडसमोर पराभवाचे संकट!

डॉ.दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

न्यूझीलंडविरुद्धच्या वेलिंग्टन कसोटीचा चौथा दिवस भारतीय फलंदाजांच्या वर्चस्वाचा, विक्रमांच्या आतषबाजीचा आणि सामन्यावरील पकड अधिक मजबूत करणारा ठरला. फलंदाजीला अनुकूल होत चाललेल्या खेळपट्टीचा पुरेपूर लाभ घेत भारतीय फलंदाजांनी यजमान गोलंदाजांची अक्षरशः दमछाक केली. रिषभ पंतचे आक्रमक शतक, लोकेश राहुलची संयमी शतकी खेळी आणि मधल्या फळीतील फलंदाजांचे योगदान यामुळे भारताने पहिल्या डावात प्रचंड धावसंख्या उभारली. मात्र, कसोटी क्रिकेटमध्ये केवळ मोठी धावसंख्या उभारणे पुरेसे नसते. प्रतिस्पर्ध्यालाही दोनदा बाद करण्यासाठी गोलंदाजांनीही तितकीच प्रभावी कामगिरी करणे आवश्यक असते. त्यामुळे चौथ्या दिवसाच्या खेळाने भारताला विजयाच्या उंबरठ्यावर आणले असले, तरी अंतिम दिवशीची रणनीती निर्णायक ठरणार आहे.

पंतचे शतक आणि भारतीय फलंदाजीचा ऐतिहासिक पराक्रम

तिसऱ्या दिवसअखेर भारताने ४ बाद ४८६ धावा केल्या होत्या. चौथ्या दिवशी ऋषभ पंत ५५ धावांवरून पुढे खेळण्यास उतरला, तर रात्रीचा पहारेकरी म्हणून आलेला अंशुल कंबोज त्याच्या साथीला होता. या दोघांनी दिवसाची सुरुवात सकारात्मक केली. कंबोजने ४२ चेंडूंत ३८ धावा करत उपयुक्त योगदान दिले. त्याच्या खेळीत सहा चौकार आणि एका षटकाराचा समावेश होता.

मात्र, दिवसाचे सर्वाधिक आकर्षण ठरला तो रिषभ पंत ! दुखापतीतून पुनरागमन करणाऱ्या या डावखुऱ्या फलंदाजाने न्यूझीलंडच्या गोलंदाजांवर आक्रमण करत आपले नववे कसोटी शतक झळकावले. अवघ्या १५३ चेंडूंत १० चौकार आणि सहा उत्तुंग षटकारांसह त्याने १२८ धावांची खेळी केली. रचिन रवींद्रच्या गोलंदाजीवर नॅथन स्मिथने त्याचा झेल टिपला आणि एका देखण्या खेळीचा शेवट झाला. पंत सेना देशात शतक ठोकणारा सहावा भारतीय ठरला. याच डावात १३६ धावा करणारा लोकेश राहुल असाच पराक्रम करणारा पाचवा भारतीय व एकमेव सलामीवीर बनला.

पंतच्या फलंदाजीतील सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे त्याने परिस्थितीनुसार बदललेली फलंदाजीची शैली. सुरुवातीला संयम, त्यानंतर गोलंदाजांवर प्रतिहल्ला आणि योग्य संधी मिळताच आक्रमक फटकेबाजी, असा त्याच्या खेळीचा प्रवास होता. कसोटी क्रिकेटमध्ये यष्टिरक्षक फलंदाजाकडून अपेक्षित असलेली जबाबदारी आणि सामना बदलण्याची क्षमता या दोन्हींचे दर्शन त्याने घडवले. त्याच्या या शतकाने एक ऐतिहासिक विक्रमही नोंदवला. दक्षिण आफ्रिका, इंग्लंड, न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलिया या चारही देशांमध्ये कसोटी शतके झळकावणारा तो आशियातील पहिला यष्टिरक्षक फलंदाज ठरला. ब्रेंडन मॅक्कुलमला मागे टाकत कसोटी क्रिकेटमध्ये सर्वाधिक षटकार मारणाऱ्या फलंदाजांच्या यादीतही त्याने दुसरे स्थान मिळवले.

पंतनंतर ध्रुव जुरेलनेही आपली गुणवत्ता सिद्ध केली. त्याने ७८ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. वॉशिंग्टन सुंदर, आकाश दीप आणि जसप्रीत बुमराह यांनीही धावसंख्येत भर घातली. परिणामी भारताने पहिला डाव ९ बाद ७२० धावांवर घोषित केला. ही धावसंख्या केवळ मोठी नव्हती, तर भारतीय कसोटी क्रिकेटच्या इतिहासातील तिसरी सर्वोच्च धावसंख्या ठरली.



न्यूझीलंडचे आव्हान सुरुवातीपासूनच खडतर होते. सलामीवीर डेव्हॉन कॉन्वे आणि टॉम ब्लंडेल यांना मोठी भागीदारी करण्यात अपयश आले. त्यानंतर मधल्या फळीतही एकाही फलंदाजाला मोठी खेळी करता आली नाही. रवींद्र जडेजा, कुलदीप यादव आणि वॉशिंग्टन सुंदर यांच्या फिरकीसमोर न्यूझीलंडचा संघ ढेपाळला. जडेजाने ४ बळी घेत न्यूझीलंडच्या मधल्या फळीचे कंबरडे मोडले. त्याला कुलदीप यादव (३ बळी) आणि वॉशिंग्टन सुंदर (२ बळी) यांनी उत्तम साथ दिली. परिणामी न्यूझीलंडचा संपूर्ण संघ अवघ्या ९३ षटकांत २०१ धावांवर तंबूत परतला.

न्यूझीलंडची दुसऱ्या डावातील कसोटी

३५२ धावांच्या पिछाडीवर असलेल्या न्यूझीलंडसमोर दुसऱ्या डावात मोठे आव्हान उभे होते. भारताला पुन्हा फलंदाजी करण्यास भाग पाडण्यासाठी यजमानांना प्रथम मोठी धावसंख्या उभारणे आवश्यक होते. परंतु भारतीय वेगवान गोलंदाजांनी सुरुवातीलाच दबाव निर्माण केला.

जसप्रीत बुमराहने दुसऱ्या डावातील दुसऱ्याच चेंडूवर कर्णधार टॉम लॅथमला बाद करून भारताला महत्त्वपूर्ण यश मिळवून दिले. त्यानंतर भारतीय गोलंदाजांनी धावांवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केला. दिवसाच्या उत्तरार्धात न्यूझीलंडने काही प्रमाणात प्रतिकार केला; मात्र प्रचंड पिछाडीमुळे त्यांच्यावरील दडपण कायम राहिले. चहापानाच्या वेळी न्यूझीलंडची धावसंख्या १ बाद ३३ होती आणि पिछाडी ३१९ धावांची होती.

न्यूझीलंडच्या गोलंदाजीचे अपयश आणि भारताची रणनीती

न्यूझीलंडच्या गोलंदाजांसाठी हा दिवस अत्यंत निराशाजनक ठरला. विशेषतः जेकब डफीला भारतीय फलंदाजांनी लक्ष्य केले. त्याने ३३ षटकांत २०१ धावा दिल्या आणि त्याला केवळ एक विकेट मिळाली. काइल जेमिसन, मॅट हेन्री आणि नॅथन स्मिथ यांनाही भारतीय फलंदाजांवर अपेक्षित अंकुश ठेवता आला नाही. खेळपट्टी फलंदाजीसाठी अनुकूल झाल्यानंतर गोलंदाजांनी अचूक टप्प्यावर गोलंदाजी करणे, क्षेत्ररक्षणाची योग्य मांडणी करणे आणि फलंदाजांच्या धावगतीला लगाम घालणे आवश्यक होते. मात्र, भारतीय फलंदाजांनी त्यांच्या योजनाच निष्प्रभ ठरवल्या. दुसरीकडे, भारतीय संघ व्यवस्थापनाने पहिल्या डावात मोठी आघाडी मिळवण्यावर भर दिला. ७२० धावांवर डाव घोषित करण्याचा निर्णय योग्य म्हणावा लागेल. कारण न्यूझीलंडला बाद करण्यासाठी भारताकडे पुरेसा वेळ उपलब्ध ठेवणे आवश्यक होते.

पाचव्या दिवसाचे आव्हान : विजयवार शिक्कामोर्तब होणार ?

चौथ्या दिवसाच्या अखेरीस भारताची स्थिती अत्यंत मजबूत झाली होती. न्यूझीलंडला ३५२ धावांची आघाडी पार करण्याबरोबरच भारतासमोर विजयाचे लक्ष्य ठेवण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागणार आहे. अंतिम दिवशी भारतीय गोलंदाजांसमोर तीन प्रमुख आव्हाने असतील.

१). सुरुवातीच्या सत्रात लवकर विकेट मिळवून न्यूझीलंडला बचावात्मक खेळण्यास भाग पाडणे.

२). हेन्री निकोल्ससारख्या अनुभवी फलंदाजाला मोठी खेळी करण्यापासून रोखणे.

३). बचावात्मक क्षेत्ररक्षणात अडकून न पडता विकेट मिळवण्याच्या दृष्टीने आक्रमक क्षेत्ररचना कायम ठेवणे.

विशेषतः बुमराहचा अनुभव, आकाश दीपची अचूकता आणि प्रसिध कृष्णाची उंची व वेग यांचा योग्य वापर केला, तर भारताला विजय मिळवण्याची चांगली संधी आहे. मात्र, कसोटी क्रिकेटमध्ये शेवटची विकेट मिळेपर्यंत विजय गृहीत धरता येत नाही.

भारताची फलंदाजी विश्वविक्रमी, आता गोलंदाजांची परीक्षा

वेलिंग्टन कसोटीचा चौथा दिवस भारतीय क्रिकेटच्या इष्टीने संस्मरणीय ठरला. लोकेश राहुलच्या संयमी शतकाने भारताच्या डावाला स्थैर्य दिले, शुभमन गिलने शतकाच्या उंबरठ्यापर्यंत मजल मारली, तर रिषभ पंतने आपल्या आक्रमक शतकाने सामन्याचे चित्रच बदलून टाकले. जयस्वाल, पडिक्कल आणि जुरेल यांच्या योगदानामुळे भारतीय फलंदाजीची ताकद अधिक ठळक झाली.

या सामन्यातून भारतीय संघाच्या फलंदाजीतील एक महत्त्वाचा गुण पुन्हा अधोरेखित झाला. एखादा फलंदाज अपयशी ठरला, तरी दुसरा फलंदाज जबाबदारी स्वीकारण्यास तयार आहे. हीच मोठ्या संघाची खरी ओळख असते.

तथापि, न्यूझीलंडच्या पहिल्या डावातील निकोल्स आणि फिलिप्स यांच्या भागीदारीने भारतीय गोलंदाजीतील काही त्रुटीही उघड केल्या होत्या. त्यामुळे केवळ फलंदाजीतील विक्रमांवर समाधान मानून चालणार नाही. निर्णायक क्षणी गोलंदाजांनीही आपली गुणवत्ता सिद्ध करणे आवश्यक आहे. वेलिंग्टनमध्ये भारताने धावांचा डोंगर उभारला आहे; आता त्या डोंगरावर विजयाचा झेंडा रोवण्याची जबाबदारी गोलंदाजांची आहे !

कसोटी क्रिकेटचा खरा कस केवळ धावा करण्यात नसतो, तर प्रतिस्पर्ध्याला दोनदा बाद करण्याच्या क्षमतेत असतो. भारताने फलंदाजीची परीक्षा उत्तम गुणांनी उत्तीर्ण केली आहे. आता अंतिम दिवशी गोलंदाज किती प्रभावी ठरतात, यावर या सामन्याचा निकाल अवलंबून असेल. दिवसअखेर न्यूझीलंडने २ बाद ११९ धावा केल्या असून अद्यापही ते २३३ धावांनी पिछाडीवर अ असल्याने डावाचा पराभव त्यांच्यापुढे उभा ठाकला आहे.

- ९०९६३७२०८२

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com / ई-पेपर : epaper.sinhvani.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

रामटेकमध्ये आज ४५ वी भव्य शोभायात्रा

आकर्षक सजावटीसह विविध स्पर्धांचे आयोजन, पहिल्या क्रमांकाच्या गटाला १ लाख १ हजार १११ रुपयांचे रोख पारितोषिक; विदर्भासह मध्यप्रदेश, छत्तीसगडमधील भाविकांची उपस्थिती

दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक

भारतीय जनसेवा मंडळ, रामटेकद्वारा संचालित शोभायात्रा समितीच्या वतीने दरवर्षीप्रमाणे वंदाही रामटेक येथे ४५ व्या भव्य शोभायात्रेचे आयोजन सोमवार, दि. २३ नोव्हेंबर २०२६ रोजी करण्यात आले आहे. ही शोभायात्रा सायंकाळी ४ वाजता श्री अठराभुजा गणेश मंदिर येथून विधिवत पूजन करून प्रारंभ होणार आहे.

शोभायात्रा शांतीनाथ जैन मंदिर, शितला माता मंदिर, शास्त्री चौक, पोलीस स्टेशन, डॉ.आंबेडकर वार्ड, एस.डी.ओ. क्वार्टर, गंगा भवन, रामाळेश्वर वार्ड, गांधी चौक, लांबे हनुमान, बायपास रोड मार्गे फिरून आदर्श शाळेच्या



मागील नगर परिषद मैदानावर रात्री ११ वाजता समाप्त होणार आहे.

यंदा शोभायात्रेतील आकर्षक देखावे व सजावटीसाठी मागील वर्षापेक्षा बक्षिसांच्या रकमेत वाढ करण्यात आली आहे. गट क्रमांक १ ला प्रथम पुरस्कार म्हणून १ लाख १ हजार १११ रुपये, गट क्रमांक २ ला २५ हजार रुपये, तर गट क्रमांक ३ ला ११ हजार रुपये रोख पारितोषिक देण्यात येणार आहे. याशिवाय उत्कृष्ट द्वार सजावटीसाठी प्रथम पुरस्कार ६ हजार रुपये, तर उत्कृष्ट रांगोळी काढणाऱ्यास ३ हजार रुपये रोख पारितोषिक व अनेक प्रोत्साहनपर पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत.

या भव्य शोभायात्रेचा आनंद घेण्यासाठी विदर्भ, मध्यप्रदेश व छत्तीसगड येथून लाखो भाविक रामटेकमध्ये दाखल होत असतात. हा उत्सव यशस्वी करण्यासाठी रामटेक तालुक्यासह नागपूर जिल्ह्यातील अनेक प्रतिष्ठित व्यक्ती, सार्वजनिक संस्था व खासगी संस्थांकडून सहकार्य मिळत आहे.

शोभायात्रेदरम्यान शिस्त व सुव्यवस्था राखण्यासाठी काही महत्त्वाचे नियम व अटी लागू करण्यात आले आहेत. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या देखाव्यांवर हद्दपार करण्यासह कारवाई करण्यात येणार असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले आहे. तसेच शोभायात्रेतील देखावे सादर करणाऱ्या मंडळांनाही नियमांची माहिती देण्यात आली आहे.

या शोभायात्रेच्या यशस्वी आयोजनासाठी समितीच्या पदाधिकाऱ्यांसह रामटेक शहरातील नागरिक परिश्रम घेत असून, सर्व रामटेककरांनी या भव्य शोभायात्रेत सहभागी होऊन उत्सवाची शोभा वाढवावी, असे आवाहन दिप हॉटेल येथे झालेल्या पत्रकार परीषदेत आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

यावेळी पत्रकार परीषदेत भारतीय जनसेवा मंडळाचे महासचिव तथा माजी आमदार डी.मल्लिकार्जुन रेड्डी, शोभायात्रा आयोजन समितीचे अध्यक्ष राजेश किंमतकर,महासचिव राहुल गुंदरे, नगरपरीषद उपाध्यक्ष आलोक मानकर, जनसेवा मंडळाचे सहसचिव सुभाष बघेले,सदस्य विनायक डांगरे, राहुल कोठेकर, शेखर बघेले, आयोजन समितीचे अनिल वाघमारे, बबलु दुधबर्वे,रजत गजभिये, मोनु रघुवंशी,धर्मेश भागलकर सह आदी उपस्थीत होते.

थोडक्यात

चोरीचे कॉपर केबल खरेदी करणारा बल्लारपूरचा भंगार व्यावसायिक एलसीबीच्या जाळ्यात: दोघांसह तिघांना अटक



दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर-धनंजय पांडरे

गौरी खदान येथून चोरी करण्यात आलेल्या कॉपर केबल प्रकरणात चोरीचा माल खरेदी करणाऱ्या बल्लारपूरच्या भंगार व्यावसायिकाला स्थानिक गुन्हे शाखेने अटक केली आहे. इलियास अहमद खान ३७ वर्षे रा. गणपती वॉर्ड, बल्लारपूर असे अटक करण्यात आलेल्या भंगार व्यावसायिकाचे नाव असून, त्याच्यासह अन्य दोघांनाही पोलिसांनी जेरबंद केले आहे. या कारवाईत १५ हजार रुपये किमतीची चोरीची कॉपर केबल जप्त करण्यात आली. राजुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गौरी खदान परिसरातून कॉपर केबल वायर चोरी झाल्याप्रकरणी १९ नोव्हेंबर २०२६ रोजी अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा क्रमांक ८२६/२६ अन्वये भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा स्थानिक गुन्हे शाखा, चंद्रपूरच्या राजुरा उपविभागीय पथकाने समांतर तपास सुरू केला. तपासादरम्यान बल्लारपूर येथील भंगार व्यावसायिक आरोपी इलियास अहमद खान याच्यासह आरोपी अमन हरिश्चंद्र केसकर १९ वर्षे रा. सरदार पटेल वॉर्ड, बल्लारपूर आणि आरोपी अतिश बालाजी पवनकर २१ वर्षे रा. सास्ती, ता. राजुरा यांना अटक करण्यात आली. त्यांच्याकडून चोरीस गेलेली १५ हजार रुपये किमतीची कॉपर केबल वायर जप्त करण्यात आली.

या प्रकरणातील आरोपी अंकित दुम्पाला रा. सास्ती, राहुल निषाद रा. भगतसिंग वॉर्ड, बल्लारपूर आणि अंकित सिंग रा. सास्ती हे तिघे अद्याप फरार असून, पोलीस त्यांचा शोध घेत आहेत. अटक आरोपी व जप्त मुद्देमाल पुढील तपासासाठी राजुरा पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला आहे. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखा, चंद्रपूरच्या राजुरा उपविभागीय पथकाने केली.

महसूलमंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची तोंडली जि.प.शाळेला भेट



दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू:मौदा

महसूलमंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या शनिवार (ता.२० नोव्हेंबर)ला दीपावली मिलन निमित्य कोदामेंढी-अरोली व खात-रेवराल या जि प क्षेत्रातील गावांमध्ये गाव भेट दौऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी त्यांनी तोंडली जि प शाळेला भेट देऊन शाळेतील विविध उपक्रमांचे कौतुक करून, शाळेच्या नावीन्यपूर्ण वाटचालीची दखल घेत भौतिक सुविधांबाबत सकारात्मक चर्चा केली.

याप्रसंगी माजी आमदार टेकचंद सावरकर, भाजपा तालुका मौदा मंडळ अध्यक्ष भगवान बावनकुळे, गट ग्रा प तोंडली सरपंचा दर्शना बागडे, उपसरपंच रामपाल धांडे, मुख्याध्यापिका अनुराधा धुर्डे सह गावातील व तालुक्यातील शासकीय अधिकारी, राजकीय व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कळमेश्वर येथे शेतकरी मेळाव्याचे आयोजन

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

कळमेश्वर तालुका व शहर काँग्रेस कमिटी तर्फे शेतकरी मेळावा व दिवाळी निमित्त कार्यक्रमाचे आयोजन सोमवार दिनांक २३ नोव्हेंबर २०२६ रोजी संत्रा मार्केट यार्ड येथील सभागृहात करण्यात आलेले आहे. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून माझी मंत्री सुनील केदार तर प्रमुख अतिथी म्हणून खासदार श्याम कुमार बर्वे उपस्थित राहणार आहे. यावेळी नवनियुक्त विधान परिषदेचे आमदार अभिजीत वंजारी यांचा सत्कार सुद्धा करण्यात येणार आहे. तर मुख्य अतिथी म्हणून नागपूर जिल्हा ग्रामीण काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अश्विन बैस, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष मुक्ता कोकडे, कुंदा राऊत, खरेदी विक्री अध्यक्ष बाबाराव कोहे, माजी बाजार समिती सभापती बाबाराव पाटील, पंचायत समितीचे माजी सभापती श्रावण दादा भिंगारे व इतर अतिथी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने शेतकरी व नागरिकांनी उपस्थित राहावे अशी आवर्जून आवाहन तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अशोक भागवत तसेच संजय धोंगडी यांनी केले आहे.

श्रीकृष्ण मंदिरात कार्तिक पौर्णिमेनिमित्त दोन दिवसीय धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

दै. सिंहवाणी वृत्त, भंडारा

श्रीकृष्ण मंदिर, कृष्ण मंदिर वार्ड, भंडारा येथे कार्तिक पौर्णिमेनिमित्त सोमवार, दिनांक २३ नोव्हेंबर व मंगळवार, दिनांक २४ नोव्हेंबर २०२६ रोजी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवार, दिनांक २३ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजेपासून सियाराम भजन मंडळाच्या वतीने भजन कार्यक्रमाला सुरुवात होणार आहे. यानंतर टिपूर पूजन व तुळशी विवाह हे धार्मिक विधी पार पडणार आहेत.



मंगळवार, दिनांक २४ नोव्हेंबर रोजी दुपारी १२ वाजेपासून भजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी दहीहंडी, महाआरती व गोपालकाला वितरणाचा धार्मिक सोहळा पार पडणार आहे. त्यानंतर सायंकाळी ६ वाजेपासून भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

या धार्मिक सोहळ्याच्या निमित्ताने मंदिर समितीच्या वतीने भाविकांना महाप्रसादासाठी आवश्यक साहित्याचे सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. भाविकांनी तांदूळ, डाळ, तेल, तिखट, हळद व इतर आवश्यक साहित्य मंदिरात आणून द्यावे. ज्यांना साहित्य देणे शक्य नाही, त्यांनी स्वेच्छेने आर्थिक स्वरूपात सहकार्य करावे. देणगीदारांना पावती देण्यात येईल.

चंद्रपुरात एलसीबीची मोठी कारवाई : ५७ गोवंशीय जनावरांची क्रूर वाहतुकीतून सुटका, ९ जनावरांचा मृत्यू; ३५.८० लाखांचा मुद्देमाल जप्त



दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर-धनंजय पांडरे

गोवंशीय जनावरांची अत्यंत अमानुषपणे आणि क्रूरतेने वाहतूक करणाऱ्या तस्करांविरुद्ध स्थानिक गुन्हे शाखा (एलसीबी) चंद्रपूरने मोठी कारवाई केली. चंद्रपूर - मुल मार्गावरील अजयपूर परिसरात १८ चाकी ट्रेलर ट्रकमधून कोंबून नेण्यात येत असलेल्या ५७ गोवंशीय जनावरांची सुटका करण्यात आली. मात्र, या क्रूर वाहतुकीत ९ जनावरांचा मृत्यू झाल्याची धक्कादायक बाब उघडकीस आली. या कारवाईत पोलिसांनी ३५ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करून एका आरोपीला अटक केली आहे. २१ नोव्हेंबर रोजी गोपनीय माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अजयपूर परिसरात सापळा रचला.

यावेळी संशयित १८ चाकी ट्रेलर ट्रकची तपासणी केली असता त्यामध्ये ५७ गोवंशीय जनावरे अत्यंत दाटीवाटीने कोंबून नेली जात असल्याचे आढळले. जनावरांना चारा-पाण्याची कोणतीही व्यवस्था नव्हती. त्यांना आखूड दोराने बांधून अमानुष पद्धतीने वाहतूक केली जात होती. या निर्दयी वाहतुकीमुळे ९ जनावरांचा मृत्यू झाला, तर उर्वरित ४८ जनावरांची पोलिसांनी सुटका केली. सुटका करण्यात आलेल्या जनावरांना तातडीने उपचार, चारा-पाणी आणि देखभालीसाठी प्यार फाउंडेशन, पडोली येथे दाखल करण्यात आले.या प्रकरणात नईमुद्दीन करिमुद्दीन शेख ४० वर्ष, रा. घुग्घुस, ता. जि. चंद्रपूर याला अटक करण्यात आली आहे.

तर इम्रान शेख, इर्शाद खान आणि मोहम्मद साकिब मोहम्मद शकूर तिघेही रा. मूर्तिजापूर, जि. अकोला हे आरोपी फरार असून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत. पोलिसांनी या कारवाईत ३० लाख रुपये किमतीचा ट्रेलर ट्रक, ५ लाख ७० हजार रुपये किमतीची ५७ गोवंशीय जनावरे आणि १० हजार रुपयांचा मोबाईल फोन असा एकूण ३५ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.याप्रकरणी आरोपींविरुद्ध रामनगर पोलीस ठाण्यात प्राण्यांना क्रूरतेने वागवण्यास प्रतिबंध अधिनियम १९६०, महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम सुधारित २०१५ तसेच भारतीय न्याय संहितेच्या लागू कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास रामनगर पोलीस करीत आहेत. सदर कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अमोल काचोरे यांच्या नेतृत्वाखाली ब्रह्मपुरी उपविभाग पथकाने केली.

आजनी येथे भागवत हरिनाम सप्ताह संपन्न

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

कामठी तालुक्यातील आजनी येथे गावातील नरेंद्र महाराज लोहकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि सौंसर येथील प्रसिद्ध कथाकार ह.भ.प श्री विलास महाराज बनाईत यांच्या हस्ते रविवार दिनांक १५ नोव्हेंबर रोजी उद्घाटन करण्यात आलेल्या सलग तिसऱ्या भागवत सप्ताहाचे समापन हभप विलास महाराज यांच्याच काल्याच्या कीर्तनासह आणि शेकडो भाविकांच्या उपस्थितीत काढलेल्या पालखी सोहळ्यासह रविवार २२ नोव्हेंबर रोजी झाले.

गावातील हनुमान मंदिर व श्री विठ्ठल रुक्मिणी देवस्थान परिसरात वारकरी संप्रदायाच्या आणि गावकऱ्यांच्या पुढाकाराने आयोजित या भव्य भागवत हरिनाम सप्ताहात ह भ प कुमारी आचल गायकवाड, सावनेर, ह भ प श्री सुरेश महाराज बाकडे, उमरखेड, बालकीर्तनकार ह भ प रुद्र महाराज कदम, उमरखेड, ह भ प श्री श्याम महाराज बडवाईक, मध्यप्रदेश, ह भ प सुबोध महाराज महल्ले, नागपूर, हभप बबलू महाराज, ह भ प पुरुषोत्तम महाराज इंगोले, उमरखेड, इत्यादी कीर्तनकारांनी आपल्या अमोघ वाणीतून भाविकांना मंत्रमुग्ध केले होते.

या सप्ताहात वीणावादक म्हणून नामदेव दवंडे, कुणाल इंगोले, बाबाराव ठाकरे विठ्ठल महाराज भोयर, चुडामण महाराज उकुंडे, भगवान महाराज सावरकर,



सुखदेव महाराज शिदेयांनी विशेष भूमिका बजावली.

या सप्ताहाच्या आयोजनाकरिता आळंदी ते पंढरपूर पायी वारी आपदा चॅरिटेबल ट्रस्ट आणि गावातील सामाजिक कार्यकर्ते बळवंतराव नेऊलकर यांचे मोठे योगदान आहे. भागवत सप्ताहात रोज विविध वेशभूषा करणाऱ्या बालकांच्या क्रीडांनी भाविकांना मोहविले होते. शुक्रवार दिनांक २० नोव्हेंबर रोजी भगवान कृष्ण आणि रुक्मिणी माता यांचे स्वयंवर पार पडले यात तृप्ती भोयर, वैष्णवी वाघमारे, परी चमेले, नैना ढोक या बालकांनी साकारलेल्या भूमिका कौतुकास पात्र ठरल्या.

या सप्ताहात सकाळ संध्याकाळ करण्यात येणाऱ्या अन्नदानात गजानन घोडे, रामेश्वर इंगोले, मोतीराम इंगोले, उमेश भाऊ रडके, रामेश्वर भोयर, प्रसाद लोहकरे, मोहनजी माकडे, ईशांत ठाकूर, वीर बजरंग क्रीडा मंडळ, शेषराव पारेकर, संजय महल्ले, बळवंतराव रडके, डॉ.महेश महाजन, गंगाधर झलके, जनजागृत गणेशोत्सव मंडळ, भूषण देवसरकर, नागोरावजी साबळे आदी गावकऱ्यांचा मोठा हातभार होता. रामदास भोयर आणि बंडूजी भोयर यांनी कीर्तनकार तसेच त्यांचे सहकारी यांची व्यवस्था स्वतःहून सांभाळली. हा भागवत सप्ताह यशस्वी करण्यासाठी नवयुवक युवा मंडळ, रेणुका क्रीडा मंडळ, जय बजरंग क्रीडा मंडळ, माँ शारदा उत्सव मंडळाचे कार्यकर्ते यांनी सहकार्य केले.

आठवडाभर चाललेल्या या सोहळ्यात देवरावजी रडके (माजी आमदार), पोलिस पाटील बळवंतराव रडके, भगवंतराव रडके, अनिल भाऊ निधान, माजी सभापती उमेश भाऊ रडके, बेनिरामजी विघे, ह भ प बंडूजी महाराज महल्ले, सरपंच हेमराज दवंडे, प्रभाकर देशमुख, तुकाराम लायबर, मोतीराम इंगोले, रामेश्वर इंगोले, खुशाल विघे, वीरेंद्र पाली, सदानंद देवसरकर, एकनाथजी महल्ले, शेषराव चौके, डोमाजी पाटील, नितीन रडके, तुषार रडके, विजय वांढरे, नरेश वाट, केशवजी गरमडे, प्रभाकर लाडस्कर, बाबुराव धंदरे, विनोद वाट, दिनेश बडगे, नरेश जीवतोडे, सुरेंद्र रामटेके, प्रवीण येलेकर, नरेंद्र जुनघरे, दिवाकर घोडे, लीलाधर वाणी, सागर चिखलकर, कवडू चिंचुलकर, प्रशांत घोडे, भैय्यालाल चमेले, गणपत झलके, विनोद भोयर, दिवाकर नागोसे, मनोहर हेटे, गजानन विघे, निलित वानखेडे, लीलाधर दवंडे, मेघा वाट, माधुरी पाली, दुर्गा भोयर, वेणूबाई भोयर, वैशाली सुरसकर, सरोज पाली, भारती वांढरे, स्वाती महल्ले, उत्तम धंदरे, रुपेश चौके, शांताराम जांभूळकर, वारकरी संप्रदायाचे सर्व सेवेकरी, गावातील विविध भजन मंडळी, ग्राम पंचायत पदाधिकारी आणि कर्मचारी, महिला भजन मंडळी, भागवत सप्ताह कमेटीचे सदस्य आणि गावातील विविध मान्यवर व्यक्ती आणि कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

रविवार दिनांक २२ नोव्हेंबर रोजी गावातून काढण्यात आलेला पालखी सोहळा आणि हभप विलास महाराज यांच्या गोपाळ काल्याच्या कीर्तनासह या सप्ताहाचे समापन झाले. याच दिवशी दुपार नंतर महाप्रसादाच्या आयोजन करण्यात आले. सलग तीन वर्ष गावात आयोजित या भागवत सप्ताहामुळे गावात अध्यात्माचे व आनंदाचे एक वातावरण निर्माण झाल्यासारखे झाले होते.

श्री धर्मशास्ता अय्यप्पा देवस्थान, नागपूर येथे अय्यप्पा भक्तांचे मालाधारण व पोन्नु पदिनेट्टाम पडी पूजन उत्साहात संपन्न

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

गाड श्रद्धा, भक्तिभाव आणि आध्यात्मिक उत्साहाच्या वातावरणात श्री धर्मशास्ता अय्यप्पा देवस्थान, गायंडे लेआउट, ८५ प्लॉट एरिया, रिंग रोड, सुयोग नगर चौक, नरेंद्र नगर एक्स्टेंशन, नागपूर येथे सुरू असलेल्या ४१ दिवसीय स्वामी अय्यप्पा मंडलम् व्रत व पूजा महोत्सवांतर्गत विविध धार्मिक विधी भक्तिमय वातावरणात संपन्न झाले.

सकाळच्या धार्मिक कार्यक्रमाचा शुभारंभ गणपती होमम् ने झाला. त्यानंतर भगवान गणेश, कार्तिकेय, अन्नपूर्णा व महादेव यांचा पंचोपचार अभिषेक तसेच भगवान श्री



अय्यप्पा स्वामींचा अष्टोपचार अभिषेक संपन्न झाला. यानंतर सर्व आराध्य देवतांची अष्टोत्तरशत अर्चना श्रद्धापूर्वक करण्यात आली.

सकाळच्या कार्यक्रमातील प्रमुख आकर्षण म्हणजे शबरीमला यात्रेस जाणाऱ्या अय्यप्पा भक्तांचा पवित्र मालाधारण सोहळा. गुरुस्वामींच्या शुभहस्ते भक्तांनी पवित्र माला धारण करून आपल्या ४१ दिवसीय स्वामी अय्यप्पा व्रताचा विधिवत शुभारंभ केला. हे पवित्र व्रत भक्ती, आत्मसंयम, शिस्त, तपश्चर्या आणि अढळ श्रद्धेचे प्रतीक असून, शबरीमला येथे भगवान अय्यप्पा स्वामींच्या दिव्य दर्शनासाठी भक्तांना आध्यात्मिकदृष्ट्या तयार करणारे आहे.

सायंकाळी सुरू असलेल्या मंडलम् पूजा पर्वातील प्रथम साप्ताहिक पोन्नु पदिनेट्टाम पडी पूजन अत्यंत श्रद्धा व भक्तिभावाने संपन्न झाले. या धार्मिक सोहळ्याचे सौजन्यपूर्ण प्रायोजकत्व डॉ. जे. शरण्या व परिवार यांनी स्वीकारले होते.

कार्यक्रमाचा शुभारंभ कलश पूजन व दीपप्रज्वलनाने झाला. त्यानंतर भगवान श्री अय्यप्पा स्वामींची अष्टोत्तरशत अर्चना करण्यात आली. या सोहळ्यातील मुख्य आकर्षण म्हणजे पवित्र पदिनेट्टाम पडी अर्थात अठरा पवित्र पायऱ्यांचे पूजन. याप्रसंगी सार्वजनिक स्वामी अय्यप्पा भक्त मंडळाच्या सदस्यांनी भक्तिमय भजने व भक्तिगीतांचे सादरीकरण केले.

उल्लेखनीय बाब म्हणजे नागपूर येथील श्री धर्मशास्ता अय्यप्पा देवस्थानमध्येही शबरीमला अय्यप्पा मंदिरातील पवित्र अठरा पायऱ्यांच्या पारंपरिक रचनेनुसार व धार्मिक परंपरांचे पालन करून, निर्धारित नियम व विधी-विधानांनुसार पवित्र पदिनेट्टाम पडीची निर्मिती करण्यात आली आहे.

सायंकाळच्या धार्मिक विधींची सांगता रात्री सुमारे ९:०० वाजता पारंपरिक पडीपाट्टू, दीपाराधना व आरतीने झाली. त्यानंतर उपस्थित भक्तांना प्रसाद व अल्पोपहाराचे वितरण करण्यात आले. भावपूर्ण वातावरणात हरिवरासनम् या पवित्र स्तोत्राचे सामूहिक गायन झाल्यानंतर मंदिराचे द्वार विधिवत बंद करण्यात आले.

सार्वजनिक स्वामी अय्यप्पा भक्त मंडळ, नागपूर यांच्या वतीने प्रथम साप्ताहिक पोन्नु पदिनेट्टाम पडी पूजनाचे प्रायोजकत्व स्वीकारल्याबद्दल डॉ. जे. शरण्या व परिवार यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले. तसेच सर्व गुरुस्वामी, अय्यप्पा भक्त आणि धार्मिक कार्यक्रमांच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य करणाऱ्या सर्व सदस्यांप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

थोडक्यात

ज्येष्ठ विधीतज्ञ प्रशांत खजांची यांना 'विधी भूषण पुरस्कार', आमदार किशोर जोरगेवार यांनी भेट घेऊन केले अभिनंदन



दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर-धनंजय पांढरे

चंद्रपूरच्या विधी क्षेत्रातील ज्येष्ठ आणि अनुभवी व्यक्तिमत्त्व असलेले प्रशांत छगनलाल खजांची यांना त्यांच्या प्रदीर्घ विधी सेवेसह सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल प्रतिष्ठेचा 'विधी भूषण पुरस्कार' जाहीर झाला आहे. या गौरवपूर्ण सन्मानाबद्दल आमदार किशोर जोरगेवार यांनी त्यांची भेट घेऊन माता महाकालीची मुर्ती देत मनःपूर्वक अभिनंदन केले. यावेळी भारतीय जनता पक्षाचे माजी महानगर अध्यक्ष सुभाष कासनगोट्टूवार, महामंत्री रविंद्र गुरुनुले, भाजप नेते प्रकाश देवतळे यांची उपस्थिती होती.

प्रशांतजी छगनलाल खजांची यांनी वकिली क्षेत्रात ४० वर्षांहून अधिक काळ आपली सेवा दिली आहे. या प्रदीर्घ प्रवासात त्यांनी विधी क्षेत्रातील अनुभव, अभ्यास आणि कार्यतत्परतेच्या बळावर आपली वेगळी ओळख निर्माण केली. न्यायव्यवस्थेशी संबंधित विविध बाबींमध्ये त्यांनी दिलेले योगदान तसेच सामाजिक क्षेत्रातील त्यांची उल्लेखनीय कामगिरी कौतुकास्पद आहे. त्यांच्या या दीर्घकालीन कार्याची दखल घेत त्यांना विधी भूषण पुरस्कार जाहीर होणे ही चंद्रपूरसाठी अभिमानाची बाब आहे. यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांनी खजांची यांच्या विधी क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभवाचा आणि समाजासाठी केलेल्या कार्याचा गौरव केला. अनेक वर्षांच्या सातत्यपूर्ण सेवेतून त्यांनी विधी क्षेत्रात आपले महत्त्वपूर्ण योगदान दिले असून, त्यांचा हा सन्मान नव्या पिढीतील विधिज्ञांसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरेल, अशा भावना व्यक्त करत त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. चंद्रपूरच्या विधी क्षेत्रातील एका अनुभवी व्यक्तिमत्त्वाचा सन्मान झाल्याने सर्व स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत आहे.

सतनाम वाहेगुरू च्या जयघोषाने बल्लारपूर नगरी दुमदुमली : नगर कीर्तनात शीख बांधवांचा उत्स्फूर्त सहभाग



दै. सिंहवाणी वृत्त, बल्लारपूर -धनंजय पांढरे

शीख धर्माचे संस्थापक व प्रथम गुरू श्री गुरुनानक देवजी यांच्या ५५७ व्या जयंतीनिमित्त साजऱ्या होणाऱ्या प्रकाशपर्वाचा उत्साह बल्लारपूर शहरात पाहायला मिळत आहे. यानिमित्त पेपर मिल परिसरातील गुरुद्वारा सभा येथून भव्य नगर कीर्तन मिरवणूक काढण्यात आली. सतनाम वाहेगुरूच्या जयघोषाने संपूर्ण शहर भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाले. या मिरवणुकीत महिला, पुरुष, युवक, युवती, बालकांसह ज्येष्ठ शीख बांधवांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. नगर कीर्तनात आकर्षक सजावट केलेल्या वाहनावरील पालखीत पवित्र गुरुग्रंथ साहिब विराजमान होते. पालखीच्या पुढे पंचप्यारे, बालसिंह आणि निशान साहिब घेऊन भाविक मार्गक्रमण करीत होते. पारंपरिक वेशभूषेत सहभागी झालेल्या शीख बांधवांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. पांढरी वस्त्रे, निळ्या-पिवळ्या पगड्या, दुपट्टे, भगवे फेटे आणि दस्तार परिधान करून भाविकांनी मिरवणुकीची शोभा वाढविली.

या नगर कीर्तनाचे विशेष आकर्षण म्हणजे शीख युवकांनी सादर केलेले पारंपरिक शौर्यप्रदर्शन ठरले. लाठ्या-काठ्या आणि पारंपरिक शस्त्रांच्या साहाय्याने युवकांनी आत्मसंरक्षणाची थरारक प्रात्यक्षिके सादर केली. विविध वाहनांवर गुरुवाणीचे मधुर स्वर आणि गुरूंच्या उपदेशांचे संदेश प्रसारित केले जात होते. पेपर मिल परिसरातील गुरुद्वारा येथून निघालेली ही मिरवणूक मुख्य मार्गाने काटा गेट, बसस्थानक, रेल्वे चौक आणि जुना बसस्थानक मार्गे डेपो गुरुद्वारा येथे पोहोचली. नगर कीर्तनाच्या स्वागतासाठी शहरातील प्रमुख मार्गांवर स्वागत कमानी उभारण्यात आल्या होत्या. विविध सामाजिक संस्था आणि राजकीय पक्षांच्या वतीने ठिकठिकाणी मिरवणुकीचे स्वागत करण्यात आले. पंचप्यारांचे पुष्पहार घालून स्वागत करण्यात आले. श्री गुरुनानक देवजी यांच्या प्रकाशपर्वानिमित्त शहरातील सर्व गुरुद्वारांना आकर्षक विद्युत रोषणाईने सजविण्यात आले आहे. येत्या २४ नोव्हेंबर रोजी गुरुनानक देवजी यांची जयंती मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने साजरी करण्यात येणार असून, संपूर्ण शीख समाजात आनंद आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

२१व्या एकांकिका बहुभाषी नाट्य महोत्सवाचे आज उद्घाटन
पाच दिवसांत विविध भाषांतील नऊ एकांकिकांचे होणार सादरीकरण

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

कला सागरच्या वतीने आणि विदर्भ हिंदी साहित्य सम्मेलनाच्या सहकार्याने आयोजित २१व्या एकांकिका बहुभाषी नाट्य महोत्सवाचे उद्घाटन सोमवार, २३ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता सेवानिवृत्त प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश व नागपूर विद्यापीठाचे लोकपाल शरद त्रिवेदी यांच्या हस्ते होईल. मोर हिंदी भवन, झांसी राणी चौक, सीताबर्डी येथील स्व. रामगोपाल माहेश्वरी सांस्कृतिक सभागृहात २७ नोव्हेंबरपर्यंत चालणाऱ्या या पाच दिवसीय महोत्सवात विविध भाषांतील एकांकिकांचे सादरीकरण करण्यात येणार आहे.

उद्घाटन कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून इंद्रायणी टीव्हीएसचे व्यवस्थापकीय संचालक विलास हरडे, एस्सेन्स इंटरनॅशनल सीबीएसई स्कूलचे संचालक विजय मेनन, निवृत्त उपनिबंधक अरविंद पाटील यांच्यासह कला सागरचे मुख्य संरक्षक व सचिव पदम नायर अध्यक्ष रविशेखर गिल्लूरकर, कार्याध्यक्ष सुशील तिवारी, उपाध्यक्ष रविंद्र बिजवे, कोषाध्यक्ष डॉ. रमेश बारस्कर तसेच सहसचिव रुपाली वंजारी आणि सविता पांडे यांची उपस्थिती राहणार आहेत.

साहित्यिकांनी गमावलेले स्थान पुन्हा प्राप्त करण्याची गरज : डॉ. अभय बंग

नांदी संमेलनाचे थाटात उद्घाटन



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

एकेकाळी साहित्यिक आणि समाजसेवक हे सामान्य जनतेचे आयकॉन होते. समाज त्यांचे म्हणणे गांभीर्याने ऐकत होता. मात्र, साहित्यिकांनी आता हे स्थान गमावले आहे. साहित्याचा उद्देश केवळ मनोरंजन एवढाच मर्यादित राहिला असून, समाजही साहित्यिकांकडे पूर्वीसारख्या गांभीर्याने पाहत नाही. त्यामुळे साहित्य आणि साहित्यिकांनी गमावलेले स्थान पुन्हा प्राप्त करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. अभय बंग यांनी केले.

महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे नियोजित आणि विदर्भ साहित्य संघ, नागपूर तर्फे व दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्राच्या सहकार्याने १०० व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या पार्श्वभूमीवर रविवारी 'नांदी संमेलनाचे' आयोजन करण्यात आले होते. या संमेलनाचे उद्घाटन सर्च फाउंडेशन, गडचिरोलीचे संस्थापक डॉ. अभय बंग यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. सिव्हिल लाइन्स येथील दक्षिण मध्य सांस्कृतिक केंद्राच्या सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाला मराठी विद्यापीठ, रिद्धपूरचे कुलगुरू डॉ. अविनाश आवलगावकर, दक्षिण मध्य सांस्कृतिक केंद्राच्या संचालक आस्था कार्लेकर, विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष डॉ गिरीश गांधी, कार्यवाह विलास मानेकर यांची मंचावर उपस्थिती होती.

डॉ. बंग म्हणाले, मराठी साहित्याची परंपरा गौरवशाली आहे. मात्र, आजवरच्या साहित्यात भूतकाळातील गौरवगाथा किंवा अन्यायाच्या दुःखगाथा अधिक प्रमाणात मांडल्या गेल्या आहेत. आता साहित्यिकांनी भूतकाळ आणि वर्तमानकाळाच्या पलीकडे जाऊन भविष्याचा वेध घेण्याची गरज आहे. भविष्यात काय घडू शकते, याचे सूचक मार्गदर्शन साहित्यिकांनी आपल्या लेखनातून करावे, अशी समाजाची त्यांच्याकडून अपेक्षा आहे. साहित्यिकाला भविष्याचा वेध घेण्याची दूरदृष्टी असते. भालचंद्र नेमाडे आणि महेश एलकुंचवार यांसारख्या साहित्यिकांच्या साहित्यामध्ये ती दिसून येते.

आजच्या समाजासमोर नैतिक उंची असलेले आदर्श नायकांची मोठी उणीव आहे. विसाव्या शतकात लेनिन, महात्मा गांधी, नेल्सन मंडेला आणि अल्बर्ट आइन्स्टाईन ही जागतिक स्तरावरील महानायकांची मोजकी उदाहरणे दिसतात. मात्र, आजच्या काळात असा एकही महानायक सहजपणे समोर येत नाही. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) माणसाचा महानायक होऊ शकत नाही. माणसाला नैतिक उंची असलेले, दिशा आणि प्रकाश दाखवणारे महानायक हवे आहेत. साहित्यिकांनी आपल्या लेखनातून अशा महानायकांच्या किमान प्रतिमा तरी निर्माण कराव्यात, असे आवाहन त्यांनी केले.

साहित्य संमेलन केवळ उत्सव किंवा गणेशोत्सवासारखे होऊ नये, तर ते गणोत्सव व्हावे. म्हणजेच सामान्य जनतेचा सहभाग, तिचे प्रश्न आणि तिचे जीवन यांना केंद्रस्थानी ठेवणारा साहित्याचा लोकउत्सव व्हावा, अशी अपेक्षाही डॉ. बंग यांनी व्यक्त केली. प्रास्ताविकातून डॉ. गिरीश गांधी यांनी नांदी संमेलनाच्या मागची भूमिका विशद केली. ज्या ज्या ठिकाणी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन पार पडले, त्या ठिकाणी १०० या संमेलनाचे नांदी संमेलन होत असून विदर्भातील हे दुसरे संमेलन असल्याचे सांगितले.

अध्यक्षीय भाषणातून आस्था कार्लेकर म्हणाल्या, साहित्य, संस्कृती, कला हे भारतीय संस्कृतीचा ठेवा आहे. हा ठेवा जतन करून ठेवण्यासाठी सर्व कलाकार, साहित्यिकांनी एकत्र येऊन प्रयत्न करावे. त्यासाठी मध्य दक्षिणीतर्फे सहकार्य करण्यात येईल, असे आश्वासन दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमर कुलकर्णी यांनी तर आभार प्रदर्शन अनिल इंदाणे यांनी केले. आकांक्षा व अक्षय चारभाई यांनी नांदी गीत सादर केले. कार्यक्रमाला विदर्भ साहित्य संघाचे उपाध्यक्ष बाळासाहेब कुलकर्णी, कोषाध्यक्ष माधुरी साकुळकर यांच्यासह साहित्य क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

साहित्य संमेलने चिंतनाची पर्वणी व्हावी : डॉ. अविनाश आवलगावकर

भारतामध्ये प्रांतिक साहित्य संमेलने आयोजित करण्यात महाराष्ट्राचा क्रमांक पहिला आहे. मराठी भाषेत आतापर्यंत १०० साहित्य संमेलने पार पडली आहेत. एवढ्या मोठ्या संख्येने साहित्य संमेलने आयोजित करण्याची परंपरा अन्य कोणत्याही भाषेत आढळत नाही. मात्र, साहित्य संमेलने केवळ हौशी लोकांच्या सहभागापुरती किंवा उत्सवी स्वरूपापुरती मर्यादित राहू नयेत. ती चिंतनाचा उत्सव बनली पाहिजेत, असे मत डॉ. अविनाश आवलगावकर यांनी व्यक्त केले.

बाल-कुमार साहित्य संमेलनाचे आज उद्घाटन, अभिनेत्री चिन्मयी सुमित यांची उपस्थिती

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर : स्त्री शिक्षण प्रसारक मंडळ आणि बाल कला अकादमी व विदर्भ सांस्कृतिक परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित बाल-कुमार साहित्य संमेलनाचे उद्घाटन सोमवार, २३ नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता संमेलनाचे उद्घाटन राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या सदस्य गीतांजली बुटी यांच्या हस्ते होत आहे. नंदनवन येथील महिला महाविद्यालयाच्या प्रांगणात होत असलेल्या या कार्यक्रमाला किशोर मासिकाचे कार्यकारी संपादक किरण केद्रे संमेलनाध्यक्ष असून बाल कला अकादमीच्या अध्यक्ष मधुरा गडकरी स्वागताध्यक्ष आहेत. यावेळी सुप्रसिद्ध नाट्याभिनेत्री चिन्मयी सुमित, ज्येष्ठ कवी आणि मुक्त चित्रकार प्रमोदकुमार अणेराव प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. यावेळी मुलांचे मासिकचे संस्थापक-संपादक जयंत मोडक यांचा सन्मान करण्यात येणार आहे. तसेच प्रसेनजित गायकवाड यांच्या काय तसे मी करू ? या बालकवितासंग्रहाचे आणि विशाल देवतळे यांच्या इवलसे सोनेरी कर्म या बालकादंबरीचे प्रकाशन होईल. दुपारच्या सत्रात चिन्मयी सुमित यांची प्रकट मुलाखत कौमुदी साल्पेकर घेतील. त्यानंतर बालकवी आणि ज्येष्ठ कवींचे कविसंमेलन, बालकथाकार आणि ज्येष्ठ कथाकारांचे कथावाचन, आधुनिक जगात वयात येणाऱ्या मुलांचे प्रश्न आणि पालक या विषयावर चर्चासत्र होणार आहे.

नाबार्डच्या अधिकाऱ्यांकडून मौदा तालुक्यातील चाचेर येथील मौदा ईसाफ फाउंडेशन समर्थित शेतकरी उत्पादक कंपनीची पाहणी



दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू:मौदा

नाबार्ड, प्रादेशिक कार्यालय, पुणे यांच्या वतीने गुरुवार (ता.१९ नोव्हेंबर २०२६) रोजी नागपूर जिल्ह्यातील ईएसएएफ (एरअझ) फाउंडेशनमार्फत कार्यरत शेतकरी उत्पादक कंपन्यांचा निरीक्षण व तपासणी दौरा आयोजित करण्यात आला. या दौऱ्यांतर्गत मौदा तालुक्यातील चाचेर येथील मौदा फसल फार्मर्स प्रोड्युसर कंपनी लिमिटेड शेतकरी उत्पादक कंपन्यांची पाहणी करण्यात आली. या दौऱ्यात ईसाफ फाउंडेशनचे महाराष्ट्र व मध्य प्रदेश राज्य प्रमुख मनिष मानकर, ईसाफ कृषी क्षेत्र उपक्रम विभागाचे विभागीय प्रमुख एम. एम. कुमार आणि नाबार्ड, प्रादेशिक कार्यालय, पुणे येथील कृषी क्षेत्र विकास विभागाचे एफपीओ प्रकल्प सहयोगी प्रमोद जाधव उपस्थित होते. मौदा फसल एफपीओचे अध्यक्ष लक्ष्मीकांत चाफले व मुख्य कार्यकारी अधिकारी राजेश सोमनाथे, संचालक मेघश्याम कुलरकर, कृष्णा चाफले, लता गिरडकर, रेखा चौरे, सह सभासद शेतकरी उपस्थित होते.

या भेटीदरम्यान शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या संचालक मंडळातील सदस्य, मुख्य कार्यकारी अधिकारी व व्यवस्थापन पथकाशी संवाद साधण्यात आला. कंपनीच्या संस्थात्मक विकासाचा आढावा, व्यवसायवृद्धी, शेतकरी सभासद नोंदणी, भागभांडवल संकलन, विविध व्यावसायिक उपक्रम तसेच कंपनीच्या आर्थिक व प्रशासकीय कामकाजाची माहिती घेण्यात आली.तसेच कंपनीच्या आवश्यक नोंदवह्या, आर्थिक व्यवहारांच्या नोंदी, लेखापरीक्षण, वैधानिक अनुपालन आणि इतर महत्त्वाच्या कागदपत्रांची तपासणी करण्यात आली. शेतकरी उत्पादक कंपन्यांनी आतापर्यंत केलेली प्रगती, आव्हाने व भविष्यातील अडचणी आणि भविष्यातील नियोजन यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

शेतकरी उत्पादक कंपन्यांनी अधिक सक्षमपणे कार्यरत राहून शेतमालाचे एकत्रीकरण, कृषी निविष्ठा व विपणन सुविधा, बाजारपेठेशी जोडणी आणि शेतकऱ्यांना अधिकाधिक आर्थिक लाभ मिळवून देण्यासाठी व्यावसायिक दृष्टिकोनातून काम करण्याचे महत्त्व यावेळी अधोरेखित करण्यात आले. या निरीक्षण व तपासणी दौऱ्याचा मुख्य उद्देश शेतकरी उत्पादक कंपन्यांची संस्थात्मक क्षमता वाढविणे, कामकाजात पारदर्शकता आणणे, नाबार्डच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन सुनिश्चित करणे आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांचा शाश्वत व्यवसायवृद्धीस चालना देणे हा होता.

ताडोबात वाघाच्या अवघ्या १० फुटांवर दुचाकीस्वाराचा जीवघेणा निष्काळजीपणा

थरारक घटनेने वनविभाग सतर्क, चौकशीचे आदेश

दै. सिंहवाणी वृत्त,
चंद्रपूर-धनंजय पांढरे



ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातील मोहर्ली बफर क्षेत्रात वन्यजीव सुरक्षेचे नियम धाब्यावर बसविण्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. रस्त्याच्या कडेला दबा धरून बसलेल्या वाघापासून अवघ्या दहा फुटांच्या अंतरावर एका दुचाकीस्वाराने आपली गाडी थांबवून वाघाचे निरीक्षण केले. वाघासारख्या हिंस्र वन्यप्राण्याच्या इतक्या जवळ जाण्याचा हा निष्काळजीपणा दुचाकीस्वाराच्या जीवावर बेतण्याची शक्यता होती. या घटनेचा व्हिडिओ समोर आल्यानंतर वनविभागाने गंभीर दखल घेत चौकशीचे आदेश दिले आहेत. शुक्रवारी दुपारी घडलेला हा संपूर्ण प्रकार कॅमेऱ्यात कैद झाला आहे.

मोहर्ली बफर मार्गावरील रस्त्याच्या कडेला गवतामध्ये एक प्रौढ वाघ विश्रांती घेत होता. विशेष म्हणजे, त्याच ठिकाणी वनविभागाने लावलेल्या फलकावर या मार्गावर वाहन थांबविल्यास पाच हजार रुपये दंड आकारण्याचा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे. मात्र, या नियमांकडे दुर्लक्ष करून एका दुचाकीस्वाराने वाघाच्या अगदी जवळ आपली गाडी थांबवली. वाघापासून अवघ्या दहा फुटांवर उभा असलेला हेल्मेटधारी दुचाकीस्वार वाघाकडे एकटक पाहत होता. त्याचवेळी काही अंतरावर उभ्या असलेल्या बसमधील प्रवाशांनी त्याला वारंवार तेथून निघून जाण्याचा इशारा दिला. मात्र, दुचाकीस्वाराने त्यांच्या सूचनांकडे दुर्लक्ष केले.

काही क्षणांतच वाघ उठून उभा राहिला आणि रस्त्याच्या कडेने चालू लागला. त्यामुळे परिसरात उपस्थित असलेल्या नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. अखेर वाघ उंच गवतात निघून गेल्यानंतर परिस्थिती निवळली. ताडोबाच्या जंगलातून जाणाऱ्या अरुंद रस्त्यांवर वाघ दिसताच वाहनचालक वाहने थांबवून गर्दी करतात. अनेकदा वाहनांच्या रांगा लागून वाहतूक कोंडी होते. यामुळे वन्यप्राण्यांच्या नैसर्गिक भ्रमंतीत अडथळा निर्माण होतोच, शिवाय पर्यटक आणि वाहनचालकांच्याही जीवाला गंभीर धोका निर्माण होतो.

या घटनेची मोहर्ली बफर क्षेत्राचे वनपरिक्षेत्र अधिकारी संतोष ठिपे यांनी पुष्टी केली असून, संबंधित दुचाकीस्वाराची ओळख पटविण्याची प्रक्रिया सुरू आहे. वन्यजीव सुरक्षेच्या नियमांचे उल्लंघन झाले आहे का, याचीही चौकशी करण्यात येत आहे. वन्यजीवांचे दर्शन घेण्याच्या नादात स्वतःचा आणि इतरांचा जीव धोक्यात घालणाऱ्या अशा बेजबाबदार वर्तनामुळे ताडोबातील वनसुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

एनटीपीसी प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांवर सकारात्मक निर्णय घ्या!

पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची प्रशासनाला सूचना, अन्नत्याग आंदोलनस्थळी भेट देत शेतकऱ्यांशी साधला संवाद, एनटीपीसी प्रशासनाला प्रश्न तातडीने मार्गी लावण्याचे निर्देश

दै. सिंहवाणी वृत्त, मौदा



नागपूर जिल्ह्यातील मौदा येथे एनटीपीसी प्रकल्पासाठी जमीन देऊनही अनेक वर्षांपासून आपल्या न्याय हक्कांच्या प्रतीक्षेत असलेल्या प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या अन्नत्याग आंदोलनस्थळी महसूलमंत्री तथा नागपूर व अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी भेट देऊन आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांशी संवाद साधला. नगराध्यक्ष प्रसन्ना (राजा) तिडके यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या या आंदोलनादरम्यान त्यांनी प्रकल्पग्रस्तांच्या मागण्या आणि समस्या जाणून घेतल्या.

यावेळी प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी आपल्या विविध मागण्या पालकमंत्री बावनकुळे यांच्यासमोर मांडल्या. एनटीपीसी प्रकल्पासाठी जमीन संपादित होऊनही अनेक वर्षांपासून अपेक्षित न्याय मिळत नसल्याची नाराजी त्यांनी व्यक्त केली. प्रकल्पग्रस्तांना कायमस्वरूपी रोजगार, स्थानिक बेरोजगारांना नोकरीच्या संधी उपलब्ध करून देणे, तसेच पुनर्वसनासंदर्भातील प्रलंबित प्रश्न तातडीने सोडविण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली.

पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यांची गांभीर्याने दखल घेत एनटीपीसी मौदाचे कार्यकारी संचालक जोसेफ बास्टियन यांच्यासह एनटीपीसी प्रशासनाला या प्रश्नांकडे संवेदनशीलतेने लक्ष देण्याच्या सूचना दिल्या. प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या न्याय मागण्यांवर सकारात्मक विचार करून त्याबाबत तातडीने निर्णय घ्यावा, असे स्पष्ट निर्देश त्यांनी प्रशासनाला दिले. प्रकल्पासाठी ज्यांनी आपल्या जमिनी दिल्या, त्या प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना न्याय मिळणे आवश्यक आहे. त्यांच्या मागण्या आणि समस्यांचे योग्य निराकरण करण्यासाठी एनटीपीसी प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेऊन आवश्यक कार्यवाही करावी, असेही पालकमंत्री बावनकुळे यांनी यावेळी स्पष्ट केले.

यावेळी माजी आमदार टेकचंद सावरकर, एनटीपीसी क्रांतिकारी प्रकल्पग्रस्त शेतकरी संघर्ष समितीचे अध्यक्ष एकनाथ वडे, भाजप शहराध्यक्ष रमेश कुभलकर, तालुका मंडळ अध्यक्ष भगवान बावनकुळे, सरपंच अक्षय पंचबुधे, निशाताई सावरकर, राधाताई अग्रवाल, शरद भोयर, मुन्ना चलसानी, डॉ. नीलिमाताई घाटोडे, नरेश बावनकुळे, शिवराज माथुरकर, बंटी हटवार, राजाराम परते यांच्यासह अन्य पदाधिकारी, कार्यकर्ते आणि प्रकल्पग्रस्त ग्रामस्थ उपस्थित होते.

थोडक्यात

ब्रह्मपुरी रोडवर भीषण अपघात, ४२ वर्षीय दुचाकीस्वाराचा मृत्यू

बैलाच्या शिंगाची छातीला झाली गंभीर दुखापत



दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर

पोलीस स्टेशन सावनेर हद्दीतील ब्रह्मपुरी रोडवर रविवार, दिनांक २२ नोव्हेंबर २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजताच्या सुमारास भीषण अपघात घडला. या अपघातात मंगेश खुशाल चंदणकर (वय ४२, रा. विद्यानडेपो, चौदामैल, नागपूर) यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. मिळालेल्या माहितीनुसार, मंगेश चंदणकर हे आपल्या मोटारसायकल क्रमांक MH 31 GE 1032 ने नागपूरच्या दिशेने जात असताना रस्त्यावरील बैलाला मागून एका कारने धडक दिली.अशी माहिती स्थानिक लोकांनी दिली या धडकेमुळे बैल बिथरून दुचाकीस्वाराच्या दिशेने धावला. यावेळी बैलाचे शिंग मंगेश यांच्या छातीला लागल्याने ते गंभीर जखमी झाले.

अपघाताची माहिती अक्षय शेवतकर यांनी सामाजिक कार्यकर्ते हितेश बनसोड यांना दिली. माहिती मिळताच हितेश बनसोड यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत जखमी मंगेश यांना धापेवाडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले. मात्र, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी करून त्यांना मृत घोषित केले.त्यानंतर मृतदेह सावनेर येथील शासकीय रुग्णालयात आणण्यात आला असून शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला आहे. या दुर्दैवी घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

चिचाळ्यातील कुस्तीच्या आमदंगलात अहिल्यानगरचा सुदर्शन खोतकर ठरला विजेता!

एक तासाच्या अटीतटीच्या लढतीनंतर पटकावली ऑल्टो कार; पहाटे ४.३० वाजेपर्यंत रंगला कुस्तीचा थरार



दै. सिंहवाणी वृत्त, रामटेक

रामटेकपासून अवघ्या तीन किलोमीटर अंतरावर असलेल्या चिचाळा येथे आयोजित भव्य कुस्तीच्या आमदंगलात अहिल्यानगर येथील पैलवान सुदर्शन खोतकर याने ओपन गटाच्या अंतिम लढतीत विजय मिळवत ऑल्टो कार पटकावली. वाशिम येथील पैलवान विजय शिदि याच्यासोबत तब्बल एक तास रंगलेल्या अटीतटीच्या लढतीत सुदर्शन खोतकर याने गुणांच्या आधारे विजय मिळविला. या चुरशीच्या लढतीने उपस्थित कुस्तीप्रेमींमध्ये प्रचंड उत्साह निर्माण केला.

न्यू पवनसूत तालीम संघ, चिचाळा यांच्या वतीने त्रिपुर पौर्णिमा मंडई उत्सवानिमित्त राणी अवंतीबाई लोधी चौक परिसरात या भव्य कुस्ती दंगलचे आयोजन करण्यात आले होते. पंचायत समिती रामटेकचे माजी सभापती नरेंद्र बंधाटे यांच्या वतीने ओपन गटातील विजेत्यास ऑल्टो कार हे आकर्षक पारितोषिक देण्यात आले होते. शनिवारी दुपारी २ वाजता सुरू झालेल्या या कुस्ती स्पर्धेतील अंतिम सामना रविवारी पहाटे ४.३० वाजता संपन्न झाला. त्यामुळे पहाटेपर्यंत कुस्तीप्रेमींनी आखाड्यातील थरारचा आनंद घेतला. या स्पर्धेत महाराष्ट्रातील विविध भागांसह हरियाणा व दिल्ली येथील नामांकित महिला व पुरुष पैलवानांनी सहभाग घेतला. पुणे, कोल्हापूर, वाशिम, अकोला, नागपूर, भंडारा, गोंदिया आदी ठिकाणांहून आलेल्या स्थानिक व नामांकित पैलवानांनी विविध वजन गटांत आपले कुस्ती कौशल्य सादर केले. ओपन गटातील विजेता पैलवान सुदर्शन खोतकर याला नरेंद्र बंधाटे व कांचनताई बंधाटे यांच्या हस्ते ऑल्टो कारची चावी प्रदान करण्यात आली. यावेळी समाजसेवक राजेश जयस्वाल, मिताराम दमाहे, संजय मोहारे, राजहंस माहुले, रितेश जिल्लारे, जयेंद्र मोहारे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

स्पर्धेदरम्यान राज्यमंत्री अॅड. आशीष जयस्वाल, माजी पंचायत समिती सभापती नरेंद्र बंधाटे, माजी जिल्हा परिषद सदस्य दूधराम सव्वालाखे, नरेश धोपटे, सतीश डोंगरे, रामटेकचे नगराध्यक्ष बिकेंद्र महाजन, डॉ. रामसिंग सहारे, मिताराम सव्वालाखे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी उपस्थिती दर्शविली. पहाटे ४.३० वाजेपर्यंत रंगलेल्या या कुस्तीच्या आमदंगलाला कुस्तीप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. सुदर्शन खोतकरच्या विजयाने चिचाळ्यातील कुस्तीप्रेमींच्या उत्साहात भर पडली.

गणेश प्रल्हाद कुलकर्णी यांचं निधन



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

शिवानंद अपार्टमेंट हनुमान नगर निवासी श्री. गणेश प्रल्हाद कुलकर्णी, यांचे दि. २१ नोव्हेंबर रोजी दीर्घ आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ७७ वर्षांचे होते. त्यांचे मोक्षधाम येथे अंतिमसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात मुलगा, सून, नात, मुलगी असा बराच मोठाआप्त परिवार आहे.

विठ्ठलरावजी अभिमानजी भोरे यांचे निधन



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

शिवाजी शिक्षण संस्था,अमरावतीचे आजीवन सदस्य आणि धनवटे नॅशनल कॉलेज,नागपूर येथून सेवानिवृत्त झालेले प्राध्यापक विठ्ठलरावजी अभिमानजी भोरे, मुळगाव-राजुरा बाजार,हल्ली मुक्काम-नवजीवन कॉलनी,वर्धा रोड,नागपूर यांचे शनिवार,दिनांक २१ नोव्हेंबर २०२६ रोजी सायंकाळी आकस्मिक निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ९० वर्षे होते.

उत्तम नागरिक घडविण्याचे हे महत्त्वाचे कार्य : नितीन गडकरी

'खासदार शिव किल्ले स्पर्धा : २०२६' चा बक्षीस वितरण सोहळा उत्साहात







दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

छत्रपती शिवाजी महाराजांचा देदीप्यमान इतिहास, त्यांचे कार्य आणि संस्कृती पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्यासाठी तसेच मुलांमध्ये राष्ट्रभक्ती आणि संस्कार रुजविण्याच्या उद्देशाने 'खासदार शिव किल्ले स्पर्धे'चे आयोजन करण्यात येते. अशा उपक्रमांमधून केवळ इतिहासाचे संवर्धन होत नाही, तर उत्तम नागरिक घडविण्याचे कार्यही साध्य होते, असे प्रतिपादन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केले.

खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीच्या वतीने दिवाळीच्या पर्वावर आयोजित करण्यात आलेल्या 'खासदार शिव किल्ले स्पर्धा - २०२६'चा बक्षीस वितरण सोहळा रविवारी ईश्वर देशमुख शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या बास्केटबॉल मैदानावर पार पडला. यावेळी नितीन गडकरी बोलत होते. कार्यक्रमाला महापौर नीता ठाकरे, आमदार प्रवीण दटके, उपमहापौर लीला हाथीबेड, भाजपचे शहराध्यक्ष दयाशंकर तिवारी, सत्तापक्ष नेते नरेंद्र बोरकर, राजे मुधोजी भोसले, कारागृह अधीक्षक वैभव सु. आगे आणि सौ. दीपा वै. आगे, खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीचे सचिव जयप्रकाश गुप्ता, कोषाध्यक्ष प्रा. राजेश बागडी, अशोक मानकर, स्पर्धेचे संयोजक अतुल गुरू आणि सहसंयोजक संजय बंगाले यांची प्रमुख उपस्थिती होती.

गडकरी यांनी आपल्या भाषणात अतुल गुरू आणि संजय बंगाले यांच्या प्रयत्नांचे विशेष कौतुक केले. या स्पर्धेत महानगरपालिकेच्या शाळांनाही सहभागी करून घेण्याचे आवाहन त्यांनी केले. सुरेश भट सभागृहाचा उपयोग सांस्कृतिक उपक्रमांसाठी व्हावा. तिथे लहान मुलांसाठी छत्रपती शिवाजी महाराज, तानाजी मालुसरे, छत्रपती संभाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर आधारित चित्रपटांचे विनामूल्य प्रदर्शन आयोजित करावे, असे आवाहन केले. पुढील वर्षी किल्ले स्पर्धा आणि पोवाडा प्रशिक्षण या दोन्ही उपक्रमांचा समन्वय साधावा, असे आवाहनही त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पालखीचे आगमन, ढोल-ताशांच्या गजरात आणि दीपप्रज्वलनाने सोहळ्याची सुरुवात झाली. आहन बनसोड आणि नवयुग विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी पोवाडा सादर केला. यावेळी सद्गुरुदास महाराज आणि प्रा. दत्ता सोनेगावकर यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

प्रास्ताविकात अतुल गुरू यांनी स्पर्धेच्या आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली आणि महानगरपालिकेच्या शाळांनीही मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन केले. प्रवीण योगी यांनी स्पर्धेच्या परीक्षण प्रक्रियेची माहिती दिली. छत्रपती शिवाजी महाराज, आई भवानी यांच्या वेशभूषेत आलेले ऋत्विक खंडाळे, प्रणिका समले, आणि प्रियांश मिरे यांच्यासह बालचमूने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. गडकरी यांनी या चिमुकल्यांचे विशेष कौतुक केले. महापौर नीता ठाकरे यांनी सर्व विजेत्यांचे अभिनंदन करून या उपक्रमात सहभागी होण्याची इच्छा व्यक्त केली.

यावेळी स्पर्धेचे परीक्षण करणारे डॉ. आनंद मांजरखेडे, डॉ. श्रीकांत पारखी, प्रवीण योगी, आशिष एरंडे, शंतनु इंगळे, अंकुश नेवलकर, सुवर्णा खडतकर, सुषमा ओझा, कस्तुरी बावणे, डॉ. शितल वैद्य, डॉ. मनीषा नागपुरे, रसिका रिसालदार आणि अभिजीत जाधव यांचा सत्कार करण्यात आला. रेणुका देशकर यांनी सूत्रसंचालन केले. संजय बंगाले यांनी आभार मानले.

स्पर्धेचा निकाल

काल्पनिक किल्ले

गट - शालेय

- प्रथम : सेवासदन सक्षम शाळा, सीताबर्डी
- द्वितीय : कल्याण मूकबधिर विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, रेशीमबाग
- तृतीय : ज्ञानज्योती निवासी अंध विद्यालय, हिंगणा

शिवकालीन किल्ले

गट - शालेय

- प्रथम : श्रीमती सी. बी. आदर्श विद्या मंदिर हायस्कूल आणि ज्युनिअर कॉलेज, गांधीबाग
- द्वितीय : सरस्वती शिशु मंदिर, केशव नगर
- तृतीय : नवयुग विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय (वाणिज्य), महाल

काल्पनिक किल्ले

गट - वैयक्तिक

- प्रथम : सुप्रिया आणि आराध्या जाधव, मानेवाडा
- द्वितीय : काव्या ढगे आणि ढगे परिवार, जामठा
- तृतीय : मंगेश बारसागडे, मानेवाडा तसेच डॉ. कोपल ठोंबरे आणि मास्टर किशल ठोंबरे, बेंनर्जी ले-आऊट

शिवकालीन किल्ले

गट - वैयक्तिक

- प्रथम : आदर्श गणेशोत्सव मंडळ, बर्डी
- द्वितीय : तेजस अकर्ते, विश्वकर्मा नगर
- तृतीय : किल्लेदार प्रतिष्ठान, सक्करदरा

शिवकालीन किल्ले गट - वैयक्तिक विशेष पारितोषिक

- मंदार आणि अर्णव उत्तलवार, सच्चिदानंद नगर

खेळ आणि व्यवसायात शिस्त, समर्पण आणि जिद्द महत्त्वाची : रूपकुमार नायडू



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

खेळ आणि व्यवसाय या दोन्ही क्षेत्रांत यश मिळवण्यासाठी आवड, शिस्त, समर्पण आणि आत्मविश्वास या गोष्टी महत्त्वाच्या आहेत, असे प्रतिपादन भारतीय हँडबॉल संघाचे माजी कर्णधार आणि आशियाई क्रीडा स्पर्धेतील खेळाडू रूपकुमार नायडू यांनी केले. विदर्भ मॅनेजमेंट असोसिएशनच्या (व्हीएमए) वतीने उद्योग भवन येथे 'खेळ : मैदानापासून व्यवस्थापनापर्यंत' या विषयावर आयोजित सत्रात ते बोलत होते.

खेळ आणि व्यवसाय व्यवस्थापन यातील साम्य स्पष्ट करताना नायडू म्हणाले, की ध्येय गाठण्यासाठी आवड आणि जिद्द आवश्यक असते. संधी मिळणे महत्त्वाचे असले, तरी त्या ओळखून त्यांचा योग्य वापर करण्याचे कौशल्यही विकसित केले पाहिजे. खेळाडूसाठी आवश्यक असलेली शिस्त व्यावसायिक जीवनातही नियोजन आणि प्रगतीसाठी उपयुक्त ठरते.

खेळ आणि व्यवसाय या दोन्ही क्षेत्रांत अपयश आणि नुकसान हे प्रवासाचा भाग असतात. त्यातून महत्त्वाचे धडे मिळतात. समस्यांवर लक्ष केंद्रित करण्याऐवजी त्यातून मार्ग काढण्याची सकारात्मक वृत्ती ठेवली पाहिजे. संयम, सांघिक भावना, सहकाऱ्यांना सहकार्य आणि चांगल्या-वाईट अनुभवांतून शिकण्याची तयारी आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले.

या सत्राचे संचालन शांतनू शेंडे यांनी केले. मुख्य सत्रापूर्वी आयोजित 'मंथन ओटीपी' सत्रात प्रवीण पंचभाई यांनी विक्रीपलीकडे जाऊन विचार करण्याची गरज आणि ग्राहकांचे वर्गीकरण (कस्टमर सेगमेंटेशन) याविषयीचे अनुभव मांडले.

डेंग्यूचे २५ रुग्ण आढळले

चारठाणा : चारठाणा गावातील नाल्या तुडुंब भरल्या असून पाणी रस्त्यावरुन वाहत आहे. उघड्या गटारी व घाणीच्या साम्राज्यामुळे गावात डासांचे साम्राज्य निर्माण झाले आहे. डासांमुळे २० ते २५ डेंगूचे रुग्ण आढळले असून त्यांच्यावर खासगी रुग्णालयांत उपचार करण्यात आले आहेत. डेंगूचे रुग्ण सापडत असतानाही ग्रामविकास अधिका-यांसह आरोग्य प्रशासन मात्र कुंभकर्णी झोपेत असल्याने नागरिकांमधून तीव्र संतांप व्यक्त होत आहे. गावात धूर फवारणीसह आवश्यक उपाययोजना तात्काळ राबविण्याची मागणी नागरिकांमधून होत आहे.

चारठाणा येथील दोन ते तीन खासगी दवाखान्यात डेंग्यूच्या रुग्णावर उपचार करण्यात आले आहेत. गावातील नाल्या तुडुंब भरून जात असल्यामुळे रस्त्यावर घान पाणी वाहत असल्यामुळे सर्वत्र दुर्गंधी पसरली आहे. यामुळे डासांची उत्पत्ती वाढली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. उघड्या गटारीने डासाच्या प्रादुर्भाव वाढत असून आरोग्याच्या प्रश्न गंभीर बनला आहे. ग्रामपंचायत व आरोग्य विभाग कुंभकर्णी झोपेत आहे.गावातील सांडपाण्याचा योग्य निचरा करण्याची व्यवस्था नसून उघड्या गटारीचे पाणी वाहत असल्याने ठिकठिकाणी सांडपाण्याची डबकी साचली आहेत. नियमित स्वच्छता होत नसल्याने डासाचा उपद्रव वाढला आहे.

संघभूमी आणि दीक्षाभूमीचे पावित्र्य समरसता व सामंजस्याने जपावे!

'संघभूमी आणि दीक्षाभूमी' विषयावरील परिसंवादात विविध मान्यवरांचे विचार



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि दीक्षाभूमी या दोन्हींचा इतिहास वेगवेगळा असला तरी दोन्हींचे कार्य व्यापक होत आहे. संघ समरसतेचा पुरस्कर्ता आहे, तर आंबेडकरवादी विचारधारही पूर्वीप्रमाणे कर्मठ आणि एकांगी राहिलेली नाही. दोन्ही विचारप्रवाहांमध्ये लवचिकता आली असून, विजयादशमी आणि धम्मचक्र प्रवर्तन दिन हे एकाच दिवशी शांततेत साजरे होतात, असे मत ज्येष्ठ साहित्यिक डॉ. वि. स. जोग यांनी व्यक्त केले. महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे नियोजित आणि विदर्भ साहित्य संघ, नागपूर आयोजित तसेच दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्राच्या सहकार्याने १०० व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या पार्श्वभूमीवर रविवारी नांदी संमेलनाचे आयोजन करण्यात आले. दक्षिण मध्य क्षेत्र सांस्कृतिक केंद्राच्या सभागृहात आयोजित या संमेलनाच्या दुपारच्या सत्रात 'संघभूमी आणि दीक्षाभूमी' या विषयावर परिसंवाद पार पडला. ज्येष्ठ साहित्यिक डॉ. वि. स. जोग यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या परिसंवादात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख डॉ. शैलेंद्र लेंडे, ज्येष्ठ विचारवंत प्रकाश एदलाबादकर, विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी आणि कार्यवाह विलास मानेकर सहभागी झाले होते.

दीक्षाभूमीविषयी विचार मांडताना डॉ. शैलेंद्र लेंडे म्हणाले की, भारताच्या आधुनिक जीवनाचा विचार करताना स्वातंत्र्यदिन, राज्यघटनेची निर्मिती आणि धम्मचक्र प्रवर्तन या तीन महत्त्वपूर्ण घटनांनी देशाचा इतिहास आकाराला आला आहे. आजच्या काळात मानव, समाज, देश आणि पर्यावरणाचा विकास करायचा असेल तर धर्मापेक्षा धम्माची गरज आहे. हा धम्माचा मार्ग दीक्षाभूमीने दिला आहे, असेही त्यांनी नमूद केले.

संघभूमीविषयी बोलताना प्रकाश एदलाबादकर यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या समरसतेच्या भूमिकेवर प्रकाश टाकला. डॉ. केशव बळिराम हेडगेवार आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या दोघांनीही आपल्या कार्यासाठी नागपूरची केली. संघभूमी आणि दीक्षाभूमी ही दोन्ही पवित्र स्थाने आहेत. या दोन्ही पवित्र स्थानांवर आपण राहतो, याचे भान ठेवून त्यांचे पावित्र्य समरसता आणि सामंजस्याने जपावे, एवढीच अपेक्षा असल्याचे त्यांनी सांगितले. डॉ. गिरीश गांधी यांनी प्रास्ताविक केले. डॉ. स्वाती मोहरीर यांनी सूत्रसंचालन केले, तर शुभदा फडणवीस यांनी आभार मानले.

'आपल्या खांद्यावर आपलाच मेंदू ठेवून विचार करण्याची गरज'

नांदी संमेलनात डॉ. चंद्रशेखर मेश्राम यांची मुलाखत

मायक्रोप्लॅस्टिक, नॅनोप्लॅस्टिक, मोबाईल आणि सोशल मीडियाचा वाढता अतिरेक तसेच कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (एआय) अतिवापरामुळे मानवी मेंदूवर होणारे परिणाम चिंताजनक आहेत. तंत्रज्ञानाचा वापर करताना त्याच्या मर्यादा आणि संभाव्य धोके ओळखून सतर्क राहणे आवश्यक असून, संत तुकाराम महाराजांच्या 'सत्य असत्याशी मन केले ग्वाही, मानियले नाही बहुमता' या विचाराप्रमाणे सदसद्विवेकबुद्धीने विचार करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन डॉ. चंद्रशेखर मेश्राम यांनी केले.

'नांदी संमेलन'मध्ये ज्येष्ठ पत्रकार बाळ कुलकर्णी व विकास झाडे यांनी त्यांची मुलाखत घेतली. डॉ. चंद्रशेखर मेश्राम यांची मुलाखत घेतली. या संवादातून शिक्षण, संशोधन, मेंदूविज्ञान, तंत्रज्ञान, साहित्य आणि सामाजिक जाणीव या विविध विषयांवर त्यांनी विचार मांडले. जन्मापासून मृत्यूपर्यंत सतत शिकणारा मेंदू आज विविध माध्यमांच्या प्रभावामुळे 'हॅक' होत असल्याचे चित्र आहे. त्यामुळे आपण कोणती माहिती स्वीकारतो, कोणत्या वातावरणात वावरतो आणि तंत्रज्ञानाचा कसा वापर करतो, याबाबत सजग राहणे आवश्यक आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि कॅल्क्युलेटरच्या अतिवापराबाबतही त्यांनी सावध केले.

साहित्य संमेलनांनी बदलत्या काळाची दिशा ओळखावी : डॉ. गिरीश गांधी

मराठी साहित्याचा प्रवाह विविध संमेलनांच्या माध्यमातून अखंडपणे सुरू आहे. संमेलनाध्यक्षांनी मांडलेल्या मौलिक विचारांचा उपयोग नवोदितांनी स्वतःच्या जडणघडणीसाठी करून घेतल्यास साहित्य संमेलनांचे खरे महत्त्व अधोरेखित होईल. तसेच सामाजिक उदासीनता झटकून चांगल्या उपक्रमांमध्ये प्रत्येकाने आपली जबाबदारी पार पाडणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष गिरीश गांधी यांनी केले. नांदी संमेलनाच्या समारोपीय कार्यक्रमात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे विदर्भ साहित्य संघाचे माजी अध्यक्ष प्रदीप दाते, कार्यवाह विलास मानेकर आणि चंद्रकांत लाखे उपस्थित होते. प्रदीप दाते यांनी बदलत्या काळानुसार संमेलनांचे स्वरूप आणि पारंपरिक पायंड्यांमध्ये बदल करून पुढील दशकाची दिशा ठरविणे आवश्यक असल्याचे सांगितले. समारोपीय कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आशावरी तिडके यांनी केले. समारोपप्रसंगी अमर कुळकर्णी यांनी पसायदानाचे गायन करून कार्यक्रमाची सांगता केली.

थोडक्यात

बेरडेपार येथे कार्तिक पौर्णिमानिमित्त तीन दिवसीय मंडई महोत्सव उद्यापासून

दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू:मौदा

दरवर्षीप्रमाणे वंदाही बेरडेपार येथील समस्त गावकरी मंडळी तर्फे उद्या मंगळवार (ता. २४ नोव्हेंबर) पासून ते गुरुवार (ता. २६ नोव्हेंबर)पर्यंत कार्तिक पौर्णिमा निमित्त तीन दिवसीय भव्य मंडई महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. मंगळवार (ता. २४ नोव्हेंबर)ला सायं ५ वाजता पासून ६५ किलो वयोगटातील भव्य कबड्डी स्पर्धा, बुधवार (ता. २५नोव्हेंबर)ला सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत कारवा येथील ह भ प श्री हिराजी राऊत महाराज यांच्या कीर्तन व दहीकाला कार्यक्रम, रात्री ८ वाजता अमर गीताची कहाणी या नऊ अंकी नाटकाचे सादरीकरण. गुरुवार (ता. २६ नोव्हेंबर)ला सकाळी १० वाजता शाहीर मोरेश्वर यांची खडीगंमत, रात्री ९ वाजता पुणे येथील सोनिया गायकवाड यांच्या लावणीच्या कार्यक्रम होणार आहे.

कार्यक्रमाचे उद्घाटक महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, अध्यक्ष राज्यमंत्री आशिष जयस्वाल, खासदार श्यामकुमार बर्वे, आमदार कृपाल तुमाने, टेकचंद सावरकर, बिकेंद्र महाजन, प्रसन्ना तिडके, भगवान बावनकुळे,वेगेश देशमुख, मुकेश अग्रवाल, सकेत बावनकुळे, अशोक हटवार, सदानंद निमकर, राहुल किरपान, अनिल निधान, प्रशांत भुरे, रोशन उमप, विशाल सेलोकर, विष्णू देशमुख, सागर गोमासे, रमेश बरकते, दत्तात्रय निंबाळकर ,महेश बेहेकर,बी पी लोणारे, मीनाक्षी घोरपडे,उज्वला पठाडे ,कैलास मोथरकर, आनंदराव नंदनवार,अमोल डहाके, प्रवीण भेंडे उपस्थित राहणार असून या तीन दिवसीय भव्य मंडई उत्सवानिमित्त आयोजित भरगच्च कार्यक्रमाच्या लाभ घेण्याचे आव्हान बेरडेपार सरपंच रेवानंद देशमुख, उपसरपंच विनोद टाकळखेडे, सचिव अश्विनी लोखंडे, सदस्यगण सदाशिव उईके, नीरज डोईफोडे, उषा चिचाम, किरण नाटकर, वैशाली घोंगडे सह समस्त बेरडेपारवासियांनी केले आहे.

सोलर प्लांट भवन्स शाळेजवळ मध्यरात्री वाघाचे दर्शन

नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण, वनविभाग प्रशासना कडून अद्याप अधिकृत पुष्टी नाही!

दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा

स्थानिक पोलीस स्टेशन हद्दीतील नांदा शिवारात असलेल्या सोलर प्लांट य भवन्स शाळेजवळ रविवारी दि. २२ नोव्हेंबर मध्यरात्री



पहाटे वाघ आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे सदर घटनेची माहिती खापा वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांना देण्यात आली असून वाघाच्या दर्शनामुळे स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा आयटी सेल प्रमुख शुभम वाहाणे हे त्यांचे मित्र सिद्धांत मून व आकाश ढोणे यांच्यासोबत नागपूर येथील एक कार्यक्रम आटोपून कारने खापरखेड्याकडे परत येत होते मध्यरात्री सुमारे १.३० वाजताच्या सुमारास सोलर प्लांट भवन्स शाळेजवळ त्यांना रस्त्यावर वाघ आढळून आला घटनेचे गांभीर्य ओळखून त्यांनी तातडीने कारच्या खिडक्यांच्या काचा बंद केल्या व खापा वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांना याबाबत माहिती दिली.

वाघाच्या हालचालीवर लक्ष ठेवण्यासाठी शुभम वाहाणे आणि त्यांचे मित्र मध्यरात्री २.३० वाजेपर्यंत म्हणजेच जवळपास एक तास घटनास्थळीच थांबून होते. मात्र झुडपात शिरलेला वाघ पुन्हा दिसून आला नाही.सोलर प्लांट भवन्स शाळेजवळ रस्त्यावर दिसलेला वाघ होता की बिबट्या याबाबत वनविभाग प्रशासनाकडून अद्याप कोणतीही अधिकृत पुष्टी करण्यात आलेली नाही मात्र वंचित बहुजन आघाडी जिल्हा आय टी सेल प्रमुख शुभम वाहने यांनी वाघ असल्याचा संशयास्पद दावा केला आहे. मध्यरात्रीच्या या घटनेमुळे त्या जुन्या चर्चांना पुन्हा एकदा उधाण आले असून या परिसरात वन्यप्राण्यांचा वावर असल्याचे संकेत मिळत आहेत.सोलर प्लांट आणि भवन्स शाळेचा परिसर हा वर्दळीचा असून या भागात विद्यार्थी व नागरिकांची मोठी ये-जा असते त्यामुळे वनविभागाने या परिसरात गस्त वाढवावी. वाघाचे ठसे तपासून खात्री करावी व नागरिकांना सतर्कतेचा इशारा द्यावा अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून केली जात आहे.

पाण्याच्या टाकीवरून पडून मजुराचा मृत्यू

नांदेड : शहरातील चौफाळा भागात महानगरपालिकेच्या पाण्याच्या टाकीचे बांधकाम सुरू असताना एका मजुराचा पडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना रविवार, दि. २२ नोव्हेंबर रोजी सकाळी



अकराच्या सुमारास घडली. शेख अन्सार शेख इब्राहिम (रा. आनंदनगर, जि. परभणी) असे मृत मजुराचे नाव आहे. या घटनेमुळे बांधकामस्थळी काम करणाऱ्या मजुरांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.चौफाळा परिसरात महानगरपालिकेच्या पाण्याच्या टाकीचे बांधकाम सुरू असून, या ठिकाणी ४ मजूर काम करीत होते. सेंट्रिंगचे साहित्य वर नेण्याचे काम सुरू असताना शेख अन्सार यांचा पाय घसरला. त्यामुळे ते पाण्याच्या टाकीखाली असलेल्या मेनहोलमध्ये पडले. या दुर्घटनेत ते गंभीर जखमी झाले.घटनेची माहिती मिळताच इतवारा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक गजानन भारती यांच्यासह पोलीस कर्मचारी रहमान आणि सुनील गोपवाड यांनी घटनास्थळी धाव घेतली.

जखमी शेख अन्सार यांना तातडीने विष्णुपुरी येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासणी करून त्यांना मृत घोषित केले. या घटनेप्रकरणी इतवारा पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. प्राथमिक माहितीनुसार पाय घसरून मेनहोलमध्ये पडल्याने ही दुर्घटना घडल्याचे पोलिसांनी सांगितले. या घटनेमुळे बांधकामस्थळी मजुरांच्या सुरक्षेसाठी आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या होत्या का? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

गडकरींसमोर बाईक ॲम्ब्युलन्सचे प्रात्यक्षिक; जनसंपर्कात नागरिकांची गर्दी







दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या जनसंपर्क कार्यक्रमात विविध समस्या, अडचणींच्या निवेदनांसोबत नेहमीच समाजोपयोगी नाविन्यपूर्ण कल्पनाही मांडल्या जातात. वंदाच्या जनसंपर्क कार्यक्रमातही बाईक ॲम्ब्युलन्सचे प्रात्यक्षिक गडकरींना दाखविण्यात आले. याशिवाय नागरिकांनी गडकरी वाडा येथे मोठ्या संख्येने जनसंपर्क कार्यक्रमाला हजेरी लावत गडकरी यांना आपल्या मागण्यांची निवेदने सादर केली. डीआरडीओच्या विकसित बाईक ॲम्ब्युलन्सला 'रक्षिता' असे नाव देण्यात आले आहे. अरुंद रस्ते आणि गर्दीच्या वस्त्यांमध्ये आपत्कालीन वैद्यकीय सेवा पोहोचविण्याच्या दृष्टीने ही अभिनव संकल्पना महत्त्वपूर्ण ठरणार आहे. गडकरी यांनी संबंधित उपक्रमाची माहिती देणारे प्रशांत अरोरा यांचे कौतुक केले. डीआरडीओच्या इन्स्टिट्यूट ऑफ न्यूक्लियर मेडिसिन अँड अलाइड सायन्सेस यांनी विकसित केलेल्या या बाईक ॲम्ब्युलन्समध्ये रुग्णाला सुरक्षितपणे वाहून नेण्यासाठी विशेष आसनव्यवस्था करण्यात आली आहे.

ऑक्सिजन पुरवठा, प्रथमोपचार साहित्य, स्प्लिंट्स, हेड इमोबिलायझर तसेच रुग्णाच्या महत्त्वाच्या शारीरिक स्थितीचे निरीक्षण करणारी यंत्रणा यात उपलब्ध आहे. रुग्णाच्या प्रकृतीविषयक माहितीचे ब्लूटूथद्वारे जवळच्या रुग्णालयापर्यंत प्रसारण करण्याची सुविधाही आहे. अरुंद रस्ते, गर्दीच्या वस्त्या आणि दुर्गम भागांत पारंपरिक रुग्णवाहिका पोहोचू शकत नसल्यास ही बाईक ॲम्ब्युलन्स उपयुक्त ठरू शकते. केंद्रीय राखीव पोलीस दलाकडून या बाईक ॲम्ब्युलन्सचा वापरही करण्यात येत आहे, अशी माहिती गडकरी यांना देण्यात आली.

दरम्यान, जनसंपर्क कार्यक्रमात विविध सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक संस्थांच्या प्रतिनिधींनी तसेच नागरिकांनी गडकरी यांची भेट घेऊन विविध मागण्यांची निवेदने सादर केली. स्थानिक समस्या, विकासकामे आणि सार्वजनिक सुविधांसंदर्भातील मागण्यांच्या निवेदनांचा यामध्ये समावेश होता. संबंधित विषयांकडे लक्ष वेधून त्यावर आवश्यक कार्यवाही करण्याची विनंती करण्यात आली. याशिवाय, यापूर्वी सादर केलेल्या मागण्यांसुसार कामे मार्गी लागल्याबद्दल काही नागरिक आणि संस्थांच्या प्रतिनिधींनी गडकरी यांची भेट घेऊन आभार मानले. विकासकामांमुळे नागरिकांना झालेल्या लाभाची माहितीही त्यांनी यावेळी दिली.

विविध धार्मिक आणि सामाजिक संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनीही गडकरी यांची सदिच्छा भेट घेतली. संस्थांच्या माध्यमातून सुरू असलेल्या सामाजिक, धार्मिक आणि जनहिताच्या उपक्रमांची माहिती देत आगामी कार्यक्रमांमध्ये सहभागी होण्याचे निमंत्रण दिले. जनसंपर्कात लेखक, साहित्यिक आणि विविध क्षेत्रांतील प्रतिनिधींनी आपली पुस्तके गडकरी यांना भेट दिली.

उमरेडमध्ये विश्व हिंदू परिषदेच्या 'हितचिंतक अभियान २०२६' ला उत्साहात सुरुवात

दै. सिंहवाणी वृत्त, उमरेड

विश्व हिंदू परिषद विहिंप विदर्भ प्रांताच्या वतीने संघटनेचे कार्य आणि विचार समाजातील तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी तसेच व्यापक सदस्य नोंदणीसाठी 'हितचिंतक अभियान २०२६' सुरू करण्यात आले आहे. रविवार, दिनांक २२ नोव्हेंबर रोजी इतवारी पेठ येथील श्रीकृष्ण मंदिरात या अभियानाचा रीतसर शुभारंभ करण्यात आला.



अभियानाची वैशिष्ट्ये आणि स्वरूप

शुभारंभ श्रीकृष्ण मंदिर कमिटीचे सदस्य श्यामसुंदर आदमने यांना अभियानाचे माहितीपत्रक आणि नोंदणी पावती देऊन या मोहिमेची सुरुवात करण्यात आली.

हे अभियान २२ नोव्हेंबर ते ६ डिसेंबर २०२६ या कालावधीत राबविण्यात येणार आहे. यामध्ये विहिंपचे कार्यकर्ते घरोघरी जाऊन नागरिकांशी संपर्क साधतील आणि केवळ २० रुपये शुल्क घेऊन त्यांना 'हितचिंतक' म्हणून जोडून घेतील.

या विशेष मोहिमेअंतर्गत संपूर्ण देशभरात १० लाख हितचिंतक बनविण्याचे भव्य उद्दिष्ट निश्चित करण्यात आले असल्याची माहिती विहिंप नागपूर ग्रामीणचे जिल्हा सहमंत्री नागेश भिवनकर यांनी दिली.

या अभियानाच्या माध्यमातून समाजातील विविध घटकांपर्यंत पोहोचून महत्त्वाच्या विषयांवर प्रबोधन केले जाणार आहे:

हिंदू समाजाचे संघटन आणि सामाजिक समरसता निर्माण करणे. भारतीय संस्कृती, परंपरा आणि सामाजिक मूल्यांचेतन व संवर्धन करणे. गोसेवा आणि गोरक्षणाचे महत्त्व पटवून देणे.धर्मांतराविरोधात व्यापक जनजागृती करणे आणि विहिंपच्या विविध सेवाकार्यांची माहिती देणे. या शुभारंभ प्रसंगी विश्व हिंदू परिषद नागपूर ग्रामीणचे जिल्हा सहमंत्री नागेश भिवनकर, सेवा सहप्रमुख विलास हुडमे, प्रखंड मंत्री सचिन राहाटे, सहमंत्री शेखर रोडे, सत्संग प्रमुख आकाश बालपांडे आणि अमित पोंगडे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते प्रामुख्याने उपस्थित होते.

भवभूतीनगरात २७ नोव्हेंबरला भव्य मंडई मेळ्याचे आयोजन

खास मंडई व दुश्मन खडी शायरी मुकाबला ठरणार मुख्य आकर्षण

दै. सिंहवाणी वृत्त, आमगाव

कालभूती माता नवयुवक मंडळ, भवभूतीनगर, आमगाव यांच्या सौजन्याने भव्य मंडई मेळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळ्याचे प्रमुख आकर्षण म्हणून खास मंडई व दुश्मन खडी शायरी मुकाबल्याचे आयोजन शुक्रवार, २७ नोव्हेंबर २०२६ रोजी रात्री ९ वाजता करण्यात आले आहे. भवभूतीनगर येथील संगमित्रा प्राथमिक शाळेजवळ हा कार्यक्रम रंगणार असून, सायंकाळी ७ वाजता मान्यवर पाहुण्यांचे स्वागत करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अनु. जाती विभाग काँग्रेस कमिटी, आमगावचे अध्यक्ष पिंकेश शेंडे राहणार आहेत. युवा नेते तथा आदिवासी विकास परिषदेचे जिल्हाध्यक्ष दुष्यंत नामदेव किरसान यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन होणार आहे. सहउद्घाटक म्हणून युवासेना विधानसभा प्रमुख, गोंदिया कुमार नायडू आणि सामाजिक कार्यकर्ते नरेश कोल्हावार उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाच्या प्रारंभी रंगमंच पूजनाचा मान माजी ग्रामपंचायत सदस्य यादव मेश्राम व माजी तंटामुक्ती समिती अध्यक्ष आनंदजी शेंडे यांना देण्यात आला आहे. दीपप्रज्वलन तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष संजय बहेकार व ॲड. भूमेश्वर पाथोडे यांच्या हस्ते होणार आहे. सहदीपप्रज्वलक म्हणून माजी ग्रामपंचायत सरपंच रमण डेकाटे आणि माजी ग्रामपंचायत सदस्य दीपक (बंटी) अग्रवाल उपस्थित राहतील.

वेगळ्या आशयाच्या तीन मराठी चित्रपटांनी वेधले प्रेक्षकांचे लक्ष

मराठी चित्रपट महोत्सवाचा समारोप

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

ऑरेंज सिटी कल्चरल फाउंडेशनच्या वतीने वनामती सभागृहात आयोजित दोन दिवसीय मराठी चित्रपट महोत्सवाचा वेगळ्या आशयाच्या तीन मराठी चित्रपटांच्या प्रदर्शनाने समारोप झाला. एनएफडीसी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर महानगरपालिका, सप्तक आणि सिने मोंटाज यांच्या सहकार्याने आयोजित या महोत्सवात रविवारी साबर बोंडा, सिनेमॅन आणि 'कुर्ला टू वेंगुर्ला' या तीन मराठी चित्रपटांचे प्रदर्शन करण्यात आले. ग्रामीण जीवन, सामाजिक वास्तव, मानवी नातेसंबंध, शिक्षण आणि मराठी चित्रपटसृष्टीसमोरील आव्हाने अशा विविध विषयांचा वेध या चित्रपटांतून घेण्यात आला.

रोहन कानवडे दिग्दर्शित 'साबर बोंडा' हा चित्रपट ग्रामीण महाराष्ट्राच्या पार्श्वभूमीवर आधारित संवेदनशील कथानक मांडतो. वडिलांच्या निधनानंतर दहा दिवसांच्या शोकविधीसाठी मूळ गावी परतलेल्या मुंबईस्थित आनंद या तरुणावर नातेवाईकांकडून लग्नासाठी दबाव आणला जातो. याच काळात त्याची बालपणीचा मित्र बाळ्या याच्याशी पुन्हा भेट होते. दोघांमधील वाढती जवळीक, समाजाच्या अपेक्षा, कौटुंबिक बंधने आणि स्वत:ची ओळख स्वीकारण्याचा संघर्ष या चित्रपटातून प्रभावीपणे मांडण्यात आला आहे.

यानंतर उमेश बागडे दिग्दर्शित 'सिनेमॅन' हा चित्रपट प्रदर्शित करण्यात आला. शिक्षणासोबतच मुलांच्या आयुष्यात कल्पनाशक्ती आणि सर्जनशीलतेचे महत्त्व अधोरेखित करणारे कथानक या चित्रपटात आहे. दुर्गम भागातील शाळेत चित्रपट दाखवताना वीज गेल्यामुळे अर्धवट चित्रपट पाहता आलेल्या अंकुर या नऊ वर्षांच्या मुलाच्या कल्पनाशक्तीतून एका नव्या कथेचा जन्म होतो. ही कथा पुढे अनपेक्षित वळण घेत थेट हॉलिवूडपर्यंत पोहोचते.

शेवटी विजय कमलकर दिग्दर्शित 'कुर्ला टू वेंगुर्ला' हा चित्रपट प्रदर्शित करण्यात आला. शहराचे आकर्षण, ग्रामीण भागातील रोजगाराच्या समस्या, तरुणांची स्वप्ने, प्रेम आणि गावाशी असलेले नाते अशा विषयांवर हा चित्रपट भाष्य करतो. कोकणातील निसर्गसौंदर्य आणि ग्रामीण जीवनशैली हे चित्रपटाचे विशेष आकर्षण ठरते. या चित्रपट महोत्सवाला प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद लाभला. विविध विषय आणि आशयांनी समृद्ध असलेल्या चित्रपटांच्या प्रदर्शनाने महोत्सवाचा समारोप उत्साहात पार पडला. यावेळी श्रीकांत देशपांडे, रवी डोंगरे, उदय पाटणकर, विकास लिमये, नितीन सहस्त्रबुद्धे, डॉ उदय गुप्ते इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

मराठी सिनेमाची खरी ताकद त्याच्या प्रादेशिकतेत, कथानकात आणि आशयात आहे. इतर चित्रपटसृष्टीची नक्कल करण्यापेक्षा मातीतल्या कथा प्रभावीपणे मांडल्यास प्रेक्षक त्यांना चांगला प्रतिसाद देतात. 'कुरला टू वेंगुर्ला' हा त्याचा उत्तम अनुभव असून, चित्रपटाला थिएटरमध्ये ५० दिवसांचा प्रतिसाद मिळाला आणि अमेझॉन



प्राइमवर प्रदर्शित झाल्यानंतर तो तीन दिवसांत ट्रेंडिंगमध्ये आला. मराठी सिनेमाला चांगल्या कथांसोबतच मोठ्या स्टुडिओ, प्रेझेंटर्स आणि वितरण व्यवस्थेचे पाठबळ आवश्यक आहे. तसेच प्रेक्षकांनीही दर्जेदार चित्रपटांना थिएटर व चित्रपट महोत्सवांमध्ये प्रतिसाद दिला पाहिजे. निर्मात्रे आणि प्रेक्षकांच्या संयुक्त प्रयत्नांतून मराठी सिनेमाचे आर्थिक गणित अधिक मजबूत होऊ शकते.

- विजय कळभकर
दिग्दर्शक, कुर्ला टू वेंगुर्ला

वडिलांच्या निधनानंतर २०१६ मध्ये गावाला गेलो असताना लग्नासाठी येणाऱ्या दबावातून दूर जाण्यासाठी मित्राची गरज भासली. याच अनुभवातून चित्रपटाची कथा सुचली.



पटकथा आणि दिग्दर्शन करताना कोणतीही अडचण आली नाही; मात्र चित्रपटाच्या निर्मितीसाठी आर्थिक पाठबळ मिळवणे हे सर्वांत मोठे आव्हान होते. व्यावसायिक चौकटीपेक्षा वेगळा विषय असल्याने निमार्ते पुढे येत नव्हते. त्यामुळे चित्रपटासाठी निधी उभारण्यास पाच वर्षे लागली. स्वतंत्र चित्रपटांसाठी आंतरराष्ट्रीय महोत्सव महत्त्वाचे असून, त्यातून चित्रपटाला ओळख आणि प्रसिद्धी मिळते. या चित्रपटाचा वर्ल्ड प्रीमियर सनडान्स फिल्म फेस्टिव्हलमध्ये झाला आणि तेथील सर्वोच्च पुरस्कार मिळाल्याने भारतीय चित्रपटसृष्टीत त्याची विशेष दखल घेतली गेली.

- रोहन कानवडे
दिग्दर्शक, साबर बोंडा



कोल्हापुरात चित्रपट निर्मितीची समृद्ध संस्कृती असून, तेथे दिग्दर्शक, लेखक, तंत्रज्ञ तसेच चित्रीकरणासाठी अनुकूल वातावरण उपलब्ध आहे. 'सिनेमॅन' चित्रपटातून समाज घडविण्यात सिनेमाची भूमिका अधोरेखित करण्यात आली आहे. मिलिंद यादव यांच्या कार्यावर आधारित या चित्रपटाच्या माध्यमातून ग्रामीण व दुर्गम भागातील मुलांपर्यंत चांगले चित्रपट पोहोचविण्याचा विचार मांडण्यात आला आहे. चित्रपट महोत्सव आणि फिल्म सोसायट्यांच्या माध्यमातून चित्रपट गावागावांत पोहोचविल्यास चित्रपटसंस्कृती विकसित होऊ शकते. मराठी चित्रपटांमध्ये दर्जेदार आशय असूनही प्रेक्षकसंख्या अपेक्षेइतकी वाढलेली नाही. मराठी चित्रपटांचे बजेट, वितरण व्यवस्था, प्रसिद्धी आणि ओटीटीचा वाढता प्रभाव ही त्यामागील कारणे आहेत. मात्र नव्या दिग्दर्शकांच्या प्रयत्नांमुळे परिस्थितीत बदल होण्यास वेळ लागेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

- संदीप गावडे
एक्झिक्युटिव्ह प्रोड्यूसर, सिनेमॅन